विषय कविता
सं. नं. १२३९
१२३९

# राष्ट्रीय कविता संग्रह

सुप्रसिद्ध राष्ट्रीयकवि कै. विनायकांपासून
कुसुमाग्रजांपर्यंतच्या कवींच्या
निवडक कवितांचा संग्रह

* * *

REFBK-0008066
REFBK-0008066
८/११/५३

—ल. ध. पाटील

अ. वि. गृह प्रकाशन

स्थळ प्रत

# राष्ट्रीय कवितासंग्रह

संपादक

**ल. ध. पाटील,** बी. ए., बी. टी., डी. बी. एड्.
व्हा. प्रिन्सिपॉल, प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, जळगांव.

REFBK-0008066

REFBK-0008066

२ ऑक्टोबर ] किंमत सव्वा रुपया [ १९५३

# प्रकाशकाचें निवेदन

श्री. ल. ध. पाटील यांनीं संपादित केलेला ' राष्ट्रीय कवितासंग्रह ' प्रकाशित करतांना आम्हांस आनंद होत आहे व एक कर्तव्य पार पाडलें अशा तऱ्हेचें समाधान वाटत आहे. निरनिराळे कवितासंग्रह नेहमीं प्रसिद्ध होत असतात, त्यांपैकीं कांहीं एका कवीच्याच कवितांचा संग्रह अशा प्रकारचे असतात, तर कांहीं कालानुक्रमानें असतात; पण ह्या संग्रहाचें वैशिष्ट्य हें कीं राष्ट्रीय वृत्तीची जोपासना व्हावी ह्या हेतूनें या संग्रहांतील कवितांची निवड श्री. पाटील यांनीं केली आहे. मानवाच्या ज्या अनेकविध भावना असतात त्यांपैकीं स्वदेशप्रीति, स्वदेशाभिमान यांना मोठें मानाचें स्थान दिलें पाहिजे. अशा तऱ्हेच्या काव्यवाचनानें तरुणांना स्फूर्ति मिळते, त्यांचा मातृभूमीचा अभिमान वृद्धिंगत होतो व देशाकरितां काय केलें पाहिजे याची त्यांना प्रेरणा मिळते.

हा संग्रह प्रसिद्ध करण्यांत आमचा हेतु विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय वृत्तीची जोपासना व्हावी असाच आहे. पारतंत्र्याच्या कालांत कवींनीं जनतेची राष्ट्रीय वृत्ति जागृत ठेवण्यासाठीं आपल्या कवितेच्या साह्यानें चळवळीस साह्य केलें. स्वातंत्र्यसंग्रामांत यांतील कांहीं गीतें तरुणांच्या मुखांत सारखीं घोळत असत. आतां स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपलें ध्येय स्वराज्याचें सुराज्य कसें होईल हें झालें आहे आणि या दृष्टीनें, समाजाची रचना व्हावी या दृष्टीनें देशांत विविध पक्षांचे विविध रीतीनें प्रयत्न चालू आहेत.

याच दृष्टीनें हा कवितासंग्रह प्रसिद्ध करणें आम्हांस उचित वाटलें. स्वातंत्र्यापूर्वी आपल्या भावना, आकांक्षा काय होत्या हें आपणांस यांतील कांहीं कवितांवरून कळेल व त्या आकांक्षा पुऱ्या होण्यासाठीं आपण काय केलें पाहिजे हेंसुद्धां यांतील कवितांच्या वाचनानें वाचकांना समजेल. वाचकांना हा कवितासंग्रह आवडेल अशी अपेक्षा आहे.

अशा कवितासंग्रहाचें संपादन श्री. ल. ध. पाटील यांनीं विनामूल्य केलें व हा संग्रह संस्थेस प्रकाशनार्थ दिला याबद्दल आम्ही त्यांचे व बहुसंख्य कवींनीं आपल्या कविता संस्थेस देणगी म्हणून दिल्याबद्दल आम्ही त्या कवींचेहि आभारी आहोंत.

२ ऑक्टोबर १९५३ ] —प्रकाशक

क्र. १२३८
स्थळ प्रत
मराठी ग्रंथ संग्रहालय
१५०८४
८११/५३

# समर्पण

परमपूज्य मातापित्यांच्या चरणीं

व

देशभक्तांच्या स्मृतीस

—संपादक

१५००८४
५-११-५३
क्र. १२३८

# परिचय

माझे एका काळचे विद्यार्थी आणि सध्यांचे स्नेही श्री. ल. ध. पाटील यांनीं संपादित केलेल्या ' राष्ट्रीय कवितासंग्रह ' या काव्यसंग्रहास परिचय म्हणून चार शब्द लिहितांना मला मनापासून आनंद होत आहे. सुमारें चार-पांच वर्षांपूर्वी श्री. पाटील हे टिळक कॉलेज ऑफ् एज्युकेशन, पुणें या अध्यापन महाविद्यालयांत बी. टी. परीक्षेसाठीं, अध्ययन करण्याकरितां आले. त्या प्रसंगीं त्यांनीं आपल्या मराठी विषयाच्या अभ्यासाचा पूरक भाग म्हणून हा कवितासंग्रह तयार केला आणि मराठीचे अध्यापक या दृष्टीनें मला दाखविला. त्यांची ही काव्यसंग्रहाची कल्पना आणि विशेषत: त्यांतील काव्यांची निवड मला आवडली आणि शक्य झाल्यास हा काव्यसंग्रह छापून प्रसिद्ध करा असा मीं त्यांना सल्ला दिला. त्यांनाहि ती कल्पना आवडली व त्याचीच फलश्रुति म्हणून आज हा काव्यसंग्रह प्रसिद्ध होण्याचा योग येत आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या अध्ययनाकरितां अनेक काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत आणि सालोसाल प्रसिद्ध होत आहेत; पण त्यांत विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय भावना विकसित करणारीं कवनें जागेच्या अभावीं थोडींच असूं शकतात. केवळ राष्ट्रीय कवनांचे संग्रहहि प्रसिद्ध झालेले आहेत; पण ते अगदीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच आहेत. त्यामुळें नवीन प्रसिद्ध होणारा हा संग्रह स्वागतार्ह असाच आहे. माध्यमिक शाळांतील इयत्ता ८ ते ११ आणि मराठी अध्यापनविद्यालयें यांत अभ्यसनीय अशी काव्यांची निवड या संग्रहांत केलेली आहे.

या संग्रहांतील काव्यांची विभागणी जरी इयत्तावार करण्यांत आलेली नसली तरी ती कांहीं विशिष्ट तत्त्वांवर केलेली आहे हें स्पष्टच दिसून येईल. त्या विभागणीवरून आपल्या राष्ट्रीय आकांक्षांची झालेली ऐतिहासिक उत्क्रान्ति दिसतेच; पण शिवाय काव्यसंग्रहास आरंभ महा-राष्ट्राविषयक कवनांनीं केलेला असल्यामुळें आणि मराठी भाषिकांना

महाराष्ट्र हा जवळचा, विशेष जिव्हाळ्याचा असा भूभाग असल्यामुळें ही विभागणी ज्ञाताकडून अज्ञाताकडे इत्यादि शैक्षणिक तत्त्वांनुसारहि झालेली आहे. अध्यापनविषयक मूलभूत तत्त्वें संपादकांनीं आत्मसात् केल्याचें हें प्रतीकच होय.

या काव्यसंग्रहाचे आणखी दोन विशेष सहजच दिसून येतात. यांतील कवनांत वृत्तवैचित्र्य असल्यामुळें त्यांच्या अभ्यासांत एक तऱ्हेची गोडी निर्माण होईल हा एक विशेष; आणि जुने-नवे, प्रसिद्ध अ-प्रसिद्ध, दूरचे-जवळचे, हयात-असलेले दिवंगत झालेले अशा विविध कवींच्या काव्यांतील निवडक काव्यांचा यांत संग्रह आहे हा दुसरा विशेष होय. विनायक, यशवंत, गिरीश, कुसुमाग्रज, सोपानदेव चौधरी अशांसारख्या कवींचीं काव्यें विद्यार्थ्यांपुढें नेहमींच असतात. पण तुळजापूरकर, कृष्णाग्रज, डॉ. फडके, मो. सी. चौधरी, ग. वि. माळी इत्यादि कवींनीं लिहिलेल्या कविता सामान्यपणें मराठी क्रमिक पुस्तकांत अजून आलेल्या फारशा दिसत नाहींत. कवितांची निवड करतांना नेहमीं राखण्यांत येणारी ठराविक सांच्याची दृष्टि सोडून हा काव्यसंग्रह तयार करण्यांत आलेला आहे हें पाहून आनंद वाटतो. बेहरे, टेकाडे इत्यादि प्रथितयश कवि पुण्या-मुंबईकडील महाराष्ट्राला—विशेषतः विद्यार्थ्यांना—अलीकडे अपरिचित होत चालले आहेत. त्यांच्या उत्कृष्ट काव्यांचा समावेश या काव्यसंग्रहांत झालेला पाहून मला एक तऱ्हेचें समाधान वाटलें. त्या दृष्टीनें हैदराबाद, गोवें या विभागांतील कवींच्या काव्यांचा समावेशहि स्वागतार्हच झाला असता.

हा संग्रह सामान्यवाचकांना आवडणारा असा असला तरी मुख्यतः तो प्रौढ विद्यार्थ्यांकरितांच आहे हें विसरून चालणार नाहीं. त्या दृष्टीनें याचा शाळांतून उपयोग कसा करतां येईल असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. मातृभाषा या नात्यानें मराठीला हल्लीं मानाचें आणि महत्त्वाचें स्थान शिक्षणक्षेत्रांत मिळत चाललें आहेच. मराठीचा अभ्यास विशेष कसोशीनें व्हावा म्हणून नुकताच अभ्यासक्रम बदलून

वाढविला आहे, आणि प्रत्यक्ष अध्यापनांतहि मराठीकरितां अधिक तास द्यावे असें सुचविलें आहे. अभ्यासक्रमांत पुरवणीवाचनाचा समावेश करण्यांत आला असून प्रतिवर्षीं क्रमिक पुस्तकांशिवाय एखादें दुसरें पुस्तक पुरवणीवाचन म्हणून अभ्यासावें अशी अपेक्षा ठेवली आहे. मात्र पुरवणी-वाचन म्हणजे गद्य पुस्तकाचें वाचन अशीच समजूत सर्वत्र झालेली दिसते. वास्तविक पुरवणीवाचनांत काव्याध्ययनाचाहि समावेश व्हावयास हवा. तसा तो शाळांनीं केल्यास काव्याच्या अध्ययनाकरितां हा संग्रह उपयुक्त होईल. वेळापत्रकांत याकरितां आठवड्यांतून, पंधरवड्यांतून, निदान पक्षीं महिन्यांतून एखादा तास राखून ठेवतां आला तरीहि बरेंच साधेल. विद्यार्थ्यांना शिक्षकांनीं अभ्यासाची योग्य दिशा दाखवून दिली म्हणजे बराचसा अभ्यास त्यांना घरींहि करतां येईल. वर्गांत नंतर त्या अभ्यासावर चर्चा केली म्हणजे भागेल. मात्र विद्यार्थी या काव्यांचा अभ्यास वर्गांत प्रत्यक्ष शिक्षकांच्या सहवासांत करोत किंवा त्यांच्या मार्गदर्शनानंतर घरीं करोत, या काव्यांचें त्यांनीं पाठान्तर मात्र अवश्य केलें पाहिजे. कोणाच्या तरी कांहींतरी गैरसमजुतीमुळें हल्लीं शाळांतून पाठान्तर नाहींसें झालें आहे, तें शिक्षणशास्त्रास मान्य नाहीं. पाठान्तर गद्य उताऱ्यांचें व्हावें, काव्यांचेंहि व्हावें, त्यांतून अशा राष्ट्रीय काव्यांचें तर अवश्य व्हावें.

या राष्ट्रीय काव्यांच्या अध्ययनापासून विद्यार्थ्यांनीं काय साधावयाचें आहे ? संपादकांनीं आपल्या निवेदनांत म्हटल्याप्रमाणें विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय भावना जागृत करणें आणि त्यांचा योग्य दिशेनें परिपोष करणें हेंच या काव्यांनीं साधावयाचें आहे. शालेय विद्यार्थी हे संस्कारक्षम असतात; त्या दृष्टीनें ही जागृति आणि हा परिपोष करण्याचें कार्य या वयांत होणें अवश्य आहे. या वयांत विद्यार्थ्यांच्या भावना योग्य त्या प्रकारें विकसित झाल्या म्हणजे भावी काळांत ते जबाबदार नागरिक झाल्यावर त्यांच्या हातांत राष्ट्रोन्नतीचीं सूत्रें देतांना जुन्या पिढीला कोणताच संदेह वाटणार नाहीं.

शाळाचालकांना श्री. पाटील यांचा हा प्रयत्न रुचो एवढी इच्छा प्रदर्शित करून हा परिचय संपवितों.

पुणें
ता. १९ ऑगस्ट १९५३

**ना. वि. पाटणकर**
मराठीचे प्राध्यापक
टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे.

# निवेदन

" राष्ट्रीय कविता " हा संग्रह पूर्ण झाल्यावर तो संगृहित करण्याच्या वेळीं माझ्या मनासमोर कोणती भूमिका होती ती स्पष्ट करणें क्रमप्राप्त आहे. 'आत्मशिक्षण' हा आजच्या नवयुगीन शिक्षणांतील महामंत्र आहे. शिक्षकावर अवलंबून राहण्याची विद्यार्थ्यांची परधार्जिणी प्रवृत्ति नाहींशी करून अभ्यासाच्या कामीं त्यांना स्वावलंबी करणें हें आजच्या शिक्षकाचें कर्तव्य आहे. या दृष्टीनें विचार केला तर विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांव्यतिरिक्त इतर वाचनाची जरुरी आहे. विद्यार्थीदशेंत त्यांच्या बालमनावर संस्कार व्हावे या हेतूनें त्यांच्या अभ्यासक्रमाची दिशा असते. 'संस्कारशील' मन संयमी असून सहकार्याची जाणीव त्याला होते. अलोट देशप्रेमाची नितान्त निष्ठा त्यांच्या मनावर रुजावी म्हणून राष्ट्रीय काव्याची जरुरी आहे.

राजकीय ध्येयाविषयीं पूर्वींपासून कवींत मतभेद नव्हता. पारतंत्र्य नको, स्वातंत्र्य हवें याविषयीं एकवाक्यता होती. त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठीं काय करावयाचें किंवा तें स्वातंत्र्य कोणत्या स्वरूपाचें व श्रेणीचें असावें हा अर्थात् तपशिलाचा भाग होता. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण किंवा असहकारिता इ० साधनांची चर्चा मेळ्यांच्या पद्यांत आली असली, तरी ती ग्रंथनिविष्ट काव्यांत क्वचितच दिसते. तांबे, केशवसुत या दोघांच्याहि काव्याचा हा विषय नव्हता. विनायक, गोविंद, सावरकर, तिवारी, अज्ञातवासी इ० कवींनीं या अंगावर विशेष भर दिला. त्यामुळें राष्ट्रीय कवि व राष्ट्रीय कविता असा भेदहि अर्वाचीन काव्यांत पडला. आपलें पूर्ववैभव नष्ट झालें व पारतंत्र्यांत अवनत स्थितीमध्यें आपण आहोंत या घटनेबद्दल शोक करणें

किंवा पूर्वजांचें वैभव व पराक्रम गाऊन स्वातंत्र्य मिळविण्यास प्रोत्साहन देणें या दोन प्रकारांत तें काव्य बसतें. कवि विनायक व अज्ञातवासी यांची कविता स्थूल मानानें पहिल्या प्रकारांत पडते व गोविंद व तिवारी यांनीं लिहिलेली कविता दुसऱ्या प्रकारांत पडते. गेल्या पिढींतील बहुतेक कवींनीं अशा स्वरूपाची राष्ट्रीय प्रेम उत्पन्न करणारी कविता लिहिली आहे. त्यांचा स्थायीभाव जरी नसला तरी देशाबद्दल वसत असलेल्या अंतःकरणांतील थोर भावना त्यांनीं आपल्या काव्यांतून स्पष्ट केल्या.

राष्ट्रीय काव्याची उत्क्रान्ति व देशांतील चळवळीची चढती श्रेणी यांचा जणूं पाठशिवणीचा खेळ चालू होता. आंदोलनाला पूरक, प्रज्वलित देशाभिमानानें प्रेरित भावना काव्यांत दृग्गोचर होऊं लागली. रशियन राज्यक्रान्तींतील वर्गविग्रहाचे प्रभावी व पुरोगामी विचार जगांत पसरतांच मराठी काव्यांत ते प्रतिबिंबित झाले. नवीन समाजव्यवस्था व्हावी या ध्येयानें स्फुरलेली, सर्वांगीण विकास व्हावा या भावनेनें ओथंबलेली, जनतेनें कार्यप्रवण व्हावें असा व्यवहार सुचविणारी काव्यसंपत्ति वाढूं लागली. वर्गविग्रहाबरोबर वर्गसमन्वयाची कल्पना लोकोत्तर असाहि सूर निघूं लागला. याच दृष्टीनें यांत महाराष्ट्रविषयक, भारतविषयक, स्वातंत्र्य-संग्रामांतील क्रान्तिगीतें व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर असे चार विभाग केले आहेत व त्या विभागाचे आरंभीं थोडक्यांत रसग्रहण दिलेलें आहे.

क्रान्तीपूर्वी असलेली देशांतील उदासीनता, क्रान्तिकालांत जनतेला उत्स्फूर्त करणारी काव्यशक्ति व क्रान्तीनंतर समाजाला मार्गदर्शक ठरलेली काव्यांतील प्रतिभा म्हणजे मानवी मनाचें पृथक्करण असेंच म्हणावें लागतें. सदर संग्रहांत प्रातिनिधिक काव्याची निवड हा दृष्टिकोन डोळ्यांसमोर होता. पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या राष्ट्रांतील विद्यार्थ्यांच्या भावनाप्रधान वृत्तीस फुंकर घालून त्यांना चेतविण्याचें कार्य करीत असतां भविष्यकालाचें अचूक मार्गदर्शन करण्याची मूलभूत जबाबदारी या काव्यानें पार पाडली आहे.

ज्या ज्या कवितांचा रचनाकाल मिळाला, तो त्या कवितांच्या खालीं दिला आहे; पण कित्येक ठिकाणीं रचनाकाल मिळू शकला नाहीं. त्या ठिकाणीं कवितेच्या ज्या संग्रहांत ती कविता प्रसिद्ध झाली, त्या कवितासंग्रहाचा प्रकाशनकाल दिलेला आहे. कवितेचा रसास्वाद घेण्यास तिचा रचनाकाल माहीत असणें अवश्य आहे, म्हणजे त्या कालांत कवीच्या मनांत काय भावना निर्माण झाल्या हें आपणांस समजतें.

शेवटीं परिशिष्ट 'अ'मध्यें कवींचा जीवनपरिचय थोडक्यांत दिला आहे.

हा राष्ट्रीय काव्यसंग्रह छापण्याची आत्मीयता दाखविणारी थोर दृष्टि, संकलनाचें परिशीलन करणारी मार्मिक पण रसिक वृत्ति अ. वि. गृहाच्या चालकांनीं दाखविल्यामुळें प्रकाशनाचें काम सहजसाध्य झालें आहे. मला जनताजनार्दनाच्या सेवेची संधि देऊन माझ्या साहित्याच्या अभिरुचीची जोपासना करण्याचें श्रेय घेतलें या त्यांच्या हार्दिक सहकार्याचा मी सतत ऋणी राहीन. प्रा. पाटणकर यांनीं प्रस्तावना लिहून माझ्या जीवनांतील भावमधुरता अलगत् उलगण्याचें जें कार्य केलें त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. राष्ट्रपित्याच्या जन्मदिनीं या राष्ट्रीय संकलनाचें प्रकाशन होत आहे ही राष्ट्रीयदृष्टचा व वैयक्तिक दृष्टचा भाग्याचीच गोष्ट आहे. माझी ही अल्पशी सेवा महाराष्ट्रीय रसिक वाचक गोड करून घेतील अशी दृढ आशा व्यक्त करून माझें हें निवेदन मी आटोपतों.

—ल. ध. पाटील

# अनुक्रमणिका

## महाराष्ट्रविषयक कविता


| | | |
|---|---|---|
| १. महाराष्ट्र-लक्ष्मी | विनायक | ३ |
| २. महाराष्ट्र-भूपाळी | द. अ. तुळजापूरकर | ४ |
| ३. महाराष्ट्र गीत | वा. गो. मायदेव | ६ |
| ४. श्रीमहाराष्ट्रगीत | गोविंदाग्रज | ७ |
| ५. महाराष्ट्र ! | कृष्णाग्रज | ११ |
| ६. तानाजी मालुसरे | कुंजविहारी | १३ |
| ७. माझा महाराष्ट्र देश | मो. सि. चौधरी | १७ |
| ८. प्रभात-पोवाडा | बी | १८ |
| ९. संयुक्त-महाराष्ट्र | डॉ. फडके | २० |
| १०. संयुक्त-महाराष्ट्र-गीत | सोपानदेव चौधरी | २१ |


## भारतविषयक कविता


| | | |
|---|---|---|
| ११. बंदिशालेंत | सोपानदेव चौधरी | २५ |
| १२. सोन्याची द्वारका | अज्ञातवासी | २६ |
| १३. प्रियकर हिंदुस्थान | वि. दा. सावरकर | २७ |
| १४. अजिंक्य भारतखंड | यशवंत | २९ |
| १५. भरतभूमि | रेंदाळकर | ३० |
| १६. हा हिंददेश माझा | आनंदराव टेकाडे | ३१ |
| १७. भारतलक्ष्मी | मा. के. काटदरे | ३२ |
| १८. गाऊं कसें तरी ? | वा. ना. देशपांडे | ३३ |

## स्वातंत्र्य-संग्रामांतील क्रान्तिगीतें


| | | |
|---|---|---|
| १९. द्या आम्हांला सुळीं | यशवंत | ३७ |
| २०. क्रान्ति—गीत | कुसुमाग्रज | ३८ |
| २१. जालियनवाला बाग | कुसुमाग्रज | ४१ |
| २२. फांसावरून | अनंत काणेकर | ४१ |
| २३. येणार कोण बोला | सेनापति बापट | ४४ |
| २४. शूरवीर | माधव जूलियन | ४५ |
| २५. स्वातंत्र्य | सानेगुरुजी | ४७ |
| २६. दिशाभूल | केशवतनय | ४९ |


## स्वातंत्र्यप्राप्तीनंतर


| | | |
|---|---|---|
| २७. स्वतंत्र झाल्यावर | ना. के. बेहरे | ५३ |
| २८. स्वतंत्रते ! | गिरीश | ५६ |
| २९. अशोकचक्रांकित तिरंगी ध्वज | ग. वि. माळी | ५७ |
| ३०. भारत माझा स्वतंत्र झाला | वसंत सबनीस | ५९ |
| ३१. क्रान्तीची आग | इंद्रराव पवार | ५९ |
| ३२. आग | प्र. के अत्रे | ६१ |
| ३३. बिजली | वसंत बापट | ६२ |


———

भाग पहिला

# महाराष्ट्र-विषयक कविता

" महाराष्ट्र " हा शब्द ऐकतांच कवींना व शाहीरांना स्फूर्ति चढते; याचें कारण ' महाराष्ट्र ' या नांवाच्या पाठीमागें असलेला तेजस्वी इतिहास होय. परकीय आक्रमणाला यशस्वी रीतीनें तोंड देऊन स्वराज्याची स्थापना करण्यांत ' महाराष्ट्र ' यशस्वी झाला. महाराष्ट्रावर अनेक आपत्ति आल्या; पण त्या सर्वांना त्यानें यशस्वी रीतीनें तोंड दिलें; म्हणूनच **विनायकांनीं** " पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावी काळ " अशा तऱ्हेचें कालचक्र असतें हा संदेश देऊन पारतंत्र्यांतहि जनतेचा धीर खचूं दिला नाहीं. आपला महाराष्ट्रदेश हा नैसर्गिक दृष्टीनें व आध्यात्मिक दृष्टीनेंहि कसा श्रेष्ठ दर्जाचा आहे याची कल्पना आपणांस " महाराष्ट्र-भूपाळी " " महाराष्ट्र-गीत " इत्यादि कवितां-वरून येईल. महाराष्ट्रांत अनेक नररत्नें होऊन गेलीं. त्यांपैकीं एका रत्नावर--तानाजी मालुसरेवर--रचिलेलें काव्यहि यांत आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विभागला गेलेला महाराष्ट्र एकत्र होणें जरुरीचें आहे. राज्यसत्ता ही आतां राजेलोकांच्या हातीं राहणारी नसून जनतेच्या हातीं आलेली आहे व त्यानुसार जनतेची संयुक्त महाराष्ट्राची मागणी चालू आहे. " संयुक्त-महाराष्ट्र-गीत " व " संयुक्त-महाराष्ट्र " ह्या कवितांत हाच विचार मांडलेला आहे.

५५०६४
८९७७५३

## १. महाराष्ट्र-लक्ष्मी

महाराष्ट्र-लक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे
यशोगीत तीचें गातां मनीं हर्ष दाटे. ।। ध्रु. ।।

पुनः पुन्हां परचक्रानें ताडिली बिचारी
दीर्घकाल खचली होती पारतंत्र्यभारीं
द्वादशाब्द दुष्काळानें जाहली भिकारी
संकटांत तीच म्हणोनी करी उंच माथें. ।। १ ।।

मावळांत वास, न ठावें जया बाह्य वारें,
नेत्रधर्म ज्यांचें लोकीं कृषीकर्म सारें,
विळाकोयतीच जयांचीं काय तीं हत्यारें
तेच वीर बनले समयीं मावळे मराठे ।। २ ।।

नये नीट धरितां ज्याला लेखणी करांनीं,
कृपादृष्टि संपत्तीची न ज्याचे ठिकाणीं,
परी यवनसत्तेची जो करी धूळधाणी
कोण तया शिवरायाच्या पावला यशातें ।। ३ ।।

साधुसंत झाले, असती, तयांची न वाण
मात्र रामदासा लाधे समर्थाभिधान
जो मनीं स्वदेशहिताचें धरोनी निशाण
ध्वजा कौपिनाची मिरवी भारतांत थाटें. ।। ४ ।।

पूर्व दिव्य ज्यांचें, त्यांना रम्य भाविकाळ,
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ,
कासया वहावी चिंता मनीं जग जहाल,
रात्र सरे तेव्हां उगवे दिनहि पूर्व वाटे. ॥ ५ ॥

—विनायक (मृत्यु ३०–३–१९०९)

## २. महाराष्ट्र-भूपाळी

प्रभावशाली परममंगला महाराष्ट्रदेशा,
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ॥

– १ –

सह्याद्रीच्या सहस्रशिखरीं उन्नत झालेला,
गोदा, कृष्णा, भीमा ह्यांनीं पुनीत केलेला,
पश्चिम सिंधू बंधु पाठिशीं, पूर्वोदधि जामात,
विंध्याद्रीची उंची लक्षी सातपुडा प्रांत,
अलंकार जयाचे पैठण, पंढरपुर,
आळंदी, चाफळ, देहू, तुळजापुर,
कीं पुणें, रायगड, शिवनेरी, सुंदर,
रजःकणाला लावुनि भालीं महाराष्ट्र देशा
तुला प्रभातीं प्रसन्नहृदयें प्रणाम परमेशा !

– २ –

वरी, नाचणी, भात पिकवितो कोंकणचा प्रांत;
गहूं, बाजरी, कापुस, शाळू देशावर होत
कांबळ खांदीं, वहाण पायीं, डोइस मुंडासें,
श्यामल वर्णी सान रूप तव सोज्ज्वळ मज भासे

ते विळे कोयते शस्त्रें हीं हातिचीं,
तीं बटें ठेंगणीं भीमेच्या कांठिचीं,
सिळविती धुळीला कीर्ति बादशाहिची,
वीरांना त्या वंदन अमुचें महाराष्ट्रदेशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा !

— ३ —

वीर प्रतापी राय शिवाजी छत्रपती अमुचा;
धर्म रक्षण्या एकचि केला घोष स्वराज्याचा;
भगवा झेंडा धन्य करी हें आनंदवनभुवन;
स्वातंत्र्याच्या जरिपटक्याला लक्ष वेळ नमन;
पुण्याई पुरली शिवभूपाची पुढें,
पेशवे पुण्याचे वळले अटकेकडे,
साम्राज्य मराठी पसरे चोहोंकडे,
स्मरणें स्फुरतें हृदय वांकतें, महाराष्ट्रदेशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा !

— ४ —

भीमा वाही तिच्या सुरावर गाई जी गीत
तीच मराठी भाषा अमुची ठसली हृदयांत;
ज्ञानेशाची ओवी, अभंगवाणी तुकयाची
श्लोक वामनी जिला भूषवी आर्या मयुराची;
एकनाथ, चोखा, गोरा, ज्ञानेश्वर,
रामदास, तुकया, नामा, मुक्तेश्वर,
नच जात पाहतो भक्तांची ईश्वर,

संतमंडळा लववूं माथा महाराष्ट्र देशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा !

– ५ –

मुक्ताबाई, तशी जनाई आळविते देवा,
सद्भावाला सहज लाभतो मोक्षाचा ठेवा,
गतवीरांचीं पुण्य-चरित्रें गाउनि अंगाई
बाळा करिते महाराष्ट्रची भगिनी वा आई ।।
शोभवी अहल्या होळकरांची पुरी,
ती सती रमा भटवंशाला उद्धरी,
स्वातंत्र्यलक्ष्मी प्रचंड संगर करी,
प्रणिपात असो ह्या देवींना महाराष्ट्रदेशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा !

—दत्तो अप्पाजी तुळजापूरकर

## ३. महाराष्ट्र-गीत

नमन महाराष्ट्र भूमि करितसों तुला
तुझियासम तूंच धन्य माय निस्तुला ।। ध्रु० ।।

तव पर्वत विंध्य सह्य शक्ति वितरिती
गोदाकृष्णादि नद्या स्फूर्ति अर्पिती
देसि विविध धान्य आणि किति फळां-फुलां ।। १ ।।

श्रेष्ठ सदाचार युक्त नाथ सुचवितो
भक्तिमणि तव तुकया भक्ति बोधितो
यत्नमार्ग रामदास शिकवि आपुला ॥ २ ॥

मावळचे कणखर तव पुत्र मावळे
तव सत्ता निर्माया शक्त जाहले
तुझियास्तव त्यांहि न का प्राण वेंचिला ! ॥ ३ ॥

राखण्या स्वधर्म येथ एक जाहलों
नेला ध्वज अटकेवर हें न विसरलों
केलें नच दूर तुझ्या वंद्य पाउलां ॥ ४ ॥

ऐक्याचा मंत्र जपुनि एक होउनी
राखणार मान तुझा जननि मानिनी
आशीर्वच दे माते ! हचा तुझ्या मुलां ॥ ५ ॥

१९३८ —वा. गो. मायदेव

## ४. श्रीमहाराष्ट्रगीत

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ धृ० ॥
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा ।
अंजनकांचनकरवंदीच्या कांटेरी देशा ।
बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा ।
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा ।
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा ।

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यांसी
जरिपटक्यासह भगव्या झेंडयाच्या एकचि देशा
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ १ ॥

अपर सिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्रदेशा ।
सह्याद्रीच्या सख्या ! जिवलगा ! महाराष्ट्रदेशा ।
पाषाणाच्या देहीं वरिसी तूं हिरव्या वेषा ।
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा ।
तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची ।
मंगल वस्ती जनस्थानिंची श्रीरघुनाथांची ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ॥ २ ॥

भिन्न वृत्तिचीं भिन्न भिन्न हीं एक जीवसत्त्वें ।
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्त्वें ।
चित्पावन बुद्धीनें करिसी तूं कर्तबगारी ।
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी ।
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर ।
ठाक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ॥ ३ ॥

ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं ।
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं ।

तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिचाही ।
लढवय्या झुंझार डोंगरी तूंच सख्या पाहीं ।
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल ।
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ॥ ४ ॥

तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा ।
वहाण पायीं अंगि कांबळी उशाखालिं धोंडा ।
विळा-कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात ।
इकडे कर्नाटक हांसतसे, तिकडे गुजरात ।
आणि मराठी भाला घेई दख्खन-कंगाल ।
तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ॥ ५ ॥

रायगडावर माय जिवाची गवळण बिनघोक ।
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाई रोख ठोक ।
करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड ।
हिरडस-मावळचा श्रीबाजी, ती पावन खिंड ।
करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा ।
कोंडाण्याचा करी सिंहगड मालुसरा तान्हा ॥ ६ ॥

रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला ।
पहिला वहिला अष्टांगांनीं प्रणाम हा त्याला ।
शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरीच्या देशा ।
पुंडलिकाच्या, शिवरायांच्या, टिळकांच्या देशा ।
अनंत कोटी ग्रंथ रचुनियां जोडी तुझ्या नामा ।
वाल्मीकीचें शतकोटी यश विष्णुदास नामा ॥ ७ ॥

मयूर, कविंच्या पूर्ण यमकमय म्हाराष्ट्रदेशा ।
कवि कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्रदेशा ।
देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा खेळ ।
तिथेंच गीतारहस्य बसवी बुद्धीचा मेळ ।
जिथें रंगलीं साधींभोळीं जनाइचीं गाणीं ।
तिथेंच खेळे श्रीपादांची कलावती वाणी ।। ८ ।।

विकावयाला अमोल असली अभंगमय वाणी ।
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी ।।
तुला जागवी ऐन पहांटे गवळी गोपाळ ।
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ ।।
मर्दानी इष्काचा प्याला तुझा भरायासी ।
उभा ठाकला सगनभाउ हा शाहुनगरवासी ।।
प्रभाकराची जडण घडण कडकडित म्हणायाला
दो हातांचा मुजरा माझा तुळशीरामाला ।। ९ ।।

भीमथडीहुनि चहुं मुलखांवर फिरले धारकरी ।
भीमथडीवर चहुं मुलखांतुनि जमले वारकरी ।।
आळंदीच्या ज्ञानोबाची भिंत घेत धांव ।
पुंडलिकाचें नांव चालवी दगडाची नाव ।।
बोलघुमट घुमवीत सारखा नवलाची भाक ।
जेजुरीवर चढी पायरी उभी नऊ लाख ।।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ।। १० ।।

संग्रह प्रसिद्ध १९२१ —गोविंदाग्रज

## ५. महाराष्ट्रा !

३.
३२९८

किती सायासानें कठिणतर जागा निवडुनी
तुवां सह्याद्रीचे वरि अमित किल्ले उभवुनी
मराठ्यांचे झेंडे अखिल भरतीं त्वां मिरविले
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥ १ ॥

तुझ्या नामा घेतां अरि–हयहि जाती बिचकुनी
तुझ्या तेजा शत्रू दिपुनी बनती अंध नयनीं
तुझ्या सच्छीलाची सरि न करुं कोणीहि शकले
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥ २ ॥

अरीचे संग्रामीं वपुवरि जरी वार बसले,
न कोण्याही काळीं वदन पळही त्वां लपविलें
सदा वाटे तूतें मरण अपमानाहुनि भलें
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥ ३ ॥

गनीमी काव्याच्या विविध तव डावा अरि फसे
तुझ्या चातुर्याची अटकळ न कोणासि गवसे
विपक्षा लीलेनें अमित समयीं त्वां चकविलें
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥ ४ ॥

शिवाजी, संताजी, समरपटु बाजी सुत तुझे,
हरी, नाना, बापू कुशल धृतिमेरू जगतिं जे
परी आतां कोठें सकल सखया सांग लपले
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥ ५ ॥

नों. नं. २५०८७
८/११/५३

दुज्या राष्ट्रांहूनी तनु जरि तुझी सान दिसते,
गुणें, धैर्यें, शौर्यें, तुज न दुसरी जोड मिळते
असा तूं सर्वांचा मुकुट म्हणुनि नांव दिधलें,
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥ ६ ॥

तुवां पूर्वी मोठी बहुत रण-कीर्ती मिळविली,
तुवां कौशल्याची अरिस ज बहुाणीव दिधली,
तुझ्या देहा आतां वद कुठुनि शैथिल्य जडलें
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥ ७ ॥

तुझी वाणी आणी मृत तनुसही जीवन अहा
तुझ्या सामर्थ्यानें गलित तनु होई अरि महा
तुवां बा साधावें पदक विजयाचेंच पहिलें
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥ ८ ॥

समर्थ, ज्ञानोबा, मयुर, तुकया, वा महिपती,
प्रतीभेचे ऐसे कवि हुडकुनी आण पुढती
जयांच्या काव्यानें मनुज तनुचें भान विसरे
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥ ९ ॥

अशी संधी आतां लवकरि न येईल फिरुनी,
नको बैसूं तीतें कधिहि चतुरा तूं गमवुनी
करी एके जागीं त्वरित तव सामर्थ्य सगळें,
महाराष्ट्रा कैसें उगिच बसणें आज रुचलें. ॥१०॥

३०-११-१९२०  --कृष्णाग्रज

# ६. तानाजी मालुसरे

शिवरायाचा सिंह सिंहगडिं पडला समरांगणीं
मराठा गडी यशाचा धनी ।।ध्रु०।।

महाराष्ट्राच्या पुण्याईच्या फुलल्या फुलवेली
सुगंधें सृष्टी दरवळली
सह्याद्रीवर दरीदरींतुनि फिरुनी प्रेमानें
वेंचिलीं फुलें फुलाऱ्यानें
फुलवरा वाहिला तेव्हां । बोलली भयाची आई
अपवित्र रक्त शत्रूंचें । मम तहान शमली नाहीं
यउं दे नव्या नवसाचा । नैवद्य अतां लवलाही
तानाजी करि शांत अंबिका स्वदेह पदिं अर्पुनी
मराठा गडी यशाचा धनी ।। १ ।।

जिजा माउली म्हणे शिवाजी, कोंडाण्यावर तें
कुणाचें निशाण फडफडतें
यश अस्मानीं दुस्मानाचें डुलतें डौलानें
दरारा तुझा मनीं नेणें
सर करुनी गड कोंडाणा । देशील कधीं मज बाळा
मी दिला मुलाचा मान । तानाजी मालुसऱ्याला,
यशवंत वीर नरसिंह । ती सांग कामगिरी त्याला
कोंडाण्याचें सुतकी वैभव बघवेना नयनीं ।
मराठा गडी यशाचा धनी ।। २ ।।

उभारिला अंगणीं सुमंगल मांडव लग्नाचा
नोवरा सुत तानाजीचा
महालक्ष्मीपरी मंदिरीं मिरवत वरमाई
कुठेंही उणेपणा नाहीं
पति पत्नी अति आनंदें । जमवुनी सकल गणगोत,
देवकार्य पूजित होती । नोवऱ्या मुलासमवेत
मंडपीं जाहली दाटी । बहु वाजंत्र्याचा थाट
शिवाजिचा जासूद पोहोंचला निरोप घेउनी,
मराठा गडी यशाचा धनी ॥ ३ ॥

कामगिरी नेमिली अम्हांला गड कोंडाण्याची
तयारी करा निघायाची
लग्नमंडपीं सेनासागर क्षणीं उचंबळला
घातला कर समशेरीला
घरधनीण बोलत होती । एकान्तीं तानाजीतें
या माझ्या रायाजीला । उजवुनी आपुल्या हातें
एवढी विनंती माना । रणिं उद्यां जायचें होतें
स्वप्न उद्यांचें आज सतीला सांगितलें कुणीं ?
मराठा गडी यशाचा धनी ॥ ४ ॥

सखे साजणी शिवरायावर सोंपविली सारी,
आमुच्या मनची मुखत्यारी
हुकुम धन्याचा अवमानुनि मी इथें कसा राहूं ?
कसा मी बेइमान होऊं ?

शुभ शकुन शिवाची आज्ञा । साधुनी मनाचा मुहुर्त
रणि निघे, वीर झुंझार । स्वसुखावर हाणुन लाथ
शिकविली शिस्त शिवबांनीं । अनुयायी आचरतात
म्हणुनि मृत्युवर मात मिळविली लढुनी रणरंगणीं
मराठा गडी यशाचा धनी ॥ ५ ॥

उदयभानु सरदार आपणां यवन म्हणवि वाचे
परि तें बीज रजपुताचें
सक्त शिस्तिनें करि रात्रंदिन राखण किल्ल्याची
दहशत मनीं मराठ्यांची
गोंधळी बनुन तानाजी । स्वातंत्र्य-पोत पाजळिला
जन तेथिल भाविक भोळे । क्षणिं फितूर जाहले त्याला
चुकवूनी जागता पहारा । चढविला गडावर हल्ला
समरसंत ते मनांत हरहर महादेव गर्जुनी
मराठा गडी यशाचा धनी ॥ ६ ॥

समशेरीहुनि असह्य संगरिं मार मराठ्यांचा
उडविला फडशा शत्रूचा
शत्रुसैन्य रणिं किती निमालें कोण करिल गणती ?
भयंकर काळोख्या रातीं
ती नव्हे रात्र काळोखी । पांघरुनि कांबळी काळी
जणुं पार्थसारथी कृष्ण । सहाय्यार्थ धावुनी आला
यशहानि धर्मवीरांनीं । वाहियली भगवंताला
मृत्युंजय जयवंत मराठी बाणा मर्दानी
मराठा गडी यशाचा धनी ॥ ७ ॥

शिणलेल्या सिंहावरि चालुनि उदयभानु ये रणा
जगांतिल प्रहराचा पाहुणा ।
शत्रु शिवारी वार बेजरब तानाजीवर करी
रणांगणीं पडला नर-केसरी ।
रक्ताच्या संकल्पानें । नैवद्य दिला देहाचा
जगदंबा भक्ताहातीं । निःपात करवि शत्रूचा
फडकला गडावर झेंडा । स्वाभिमान स्वातंत्र्याचा
शिवाजिचें जयगीत गाइलें रणिं रणदेवींनीं
मराठा गडी यशाचा धनी ॥ ८ ॥

गड आला पण सिंह हरपला वदली शिववाणी
वाहती दुःखाश्रू लोचनीं
ह्या अश्रूंवर मालुसऱ्यांचा कीर्तिवेल वाढे
अजुनि जन गाती पोवाडे
सद्‌भाव महाराष्ट्राचा । हें औषध अमरत्वाचें,
मर्दानी श्रद्धाबीज । खडकावर उगवायाचें
दिवसाला दिपवित होतें । दिव्य तेज महाराष्ट्राचें
कुंजविहारी वंदि तयाला वाक्सुमनें वाहुनी
मराठा गडी यशाचा धनी ॥ ९ ॥

१९२६ —कुंजविहारी

## ७. माझा महाराष्ट्र देश

भीमा, कृष्णा, गोदा ह्यांनीं पावन केलेला
सह्याद्रीच्या सहस्र शिखरीं, उन्नत झालेला
शिवरायानें दिधला ज्यासि, उज्ज्वल संदेश
सुखशांतीचा दाता माझा, महाराष्ट्र देश ॥ १ ॥

पुणें पंढरी पैठण ज्यासी, शोभा अती देती
करवीरादी क्षेत्रें जेथें, आनंदित करिती
सिंह-दूर्ग शिवनेरी ज्याचे अलंकार शेष
सुखशांतीचा दाता माझा, महाराष्ट्र देश ॥ २ ॥

बाजी, तानाजी वीरांनीं, शौर्यें रक्षियला
राघोबानें ज्याचा झेंडा अटकेवरि नेला
ज्याची दिगंत कीर्ति ऐकुनि, येतो आवेश
सुखशांतीचा दाता माझा, महाराष्ट्र देश ॥ ३ ॥

दिल्लीचा सम्राटही जेथें, हतोत्साह झाला
संभाजीनें धर्मासाठीं, जिथें बळी दिधला
मर्द मराठा वीरांचा हा, सुंदर भूदेश
सुखशांतीचा दाता माझा, महाराष्ट्र देश ॥ ४ ॥

महादजी मल्हार होळकर, जिथें जन्म घेती
संताजी सूर्याजी जेथें, वीर गती जाती
स्वातंत्र्याचा केला ज्यांनीं, एकचि जयघोष
सुखशांतीचा दाता माझा, महाराष्ट्र देश ॥ ५ ॥

राजनीतिचे भास्कर नाना, जन्माला आले
बाळाजी बल्लाळ वीरवर, होउनियां गेले
ज्याच्यासाठीं त्यांनीं केले, अनंत ते क्लेश
सुखशांतीचा दाता माझा, महाराष्ट्र देश ॥ ६ ॥

स्वराज्य हिंदी द्यावें आम्हां, ओनामा केला
त्या टिळकांच्या जयघोषाचा, नाद जिथें आला
पाळीपोषी आम्हांला हा, अमुचा परमेश
सुखशांतीचा दाता माझा, महाराष्ट्र देश ॥ ७ ॥

प्रकाशन काल १९४२ —मो. सि. चौधरी

## ८. प्रभात पोवाडा

उठा उठा नरनारी ! आतां रात्र होय सरती
सूर्योदयकाळाचे शाहिर ललकारी देती. ॥
नाथोदय चिन्हितां कंचुकी गात्रीं तटतटलीं
कणोकणीं वसुधांगीं चंचल विद्युत् संचरली. ॥
सौंदर्याचा चढतो जणुं कीं सत्यावर उजळा
लोकनाथ तो उदया येतो, वंदू या त्याला. ॥
महाराष्ट्रपार्वती उग्रतप आजवरी तपली
परमकृपेची पाखर तिजवर परमेश्वर घाली. ॥

दुःस्वप्नाची निशा चेटकी ओसरून गेली
उत्कट उत्कंठेनें जनता उत्साहित झाली. ॥
महाराष्ट्रभाग्याची आतां पहाट ही फुटली
दैन्यकाळिमा मराठमंडळ वदनाची फिटली. ॥
वैगुण्याच्या हिडिस ढगांनीं दिग्बंधन होतां
अवनति वाहुन चहोंकडोनी शिगेवरून जातां; ॥
किरण पूर्ण तेजाचा कोणी कडकुन निकडीनें
करित चुराडा त्यांचा येतो भूवर धडक्यानें ॥
महाराष्ट्रभूमंडन कंकण बांधुन विजयाचें
राय शिवाजी आला, वंदु चला चरण त्याचे. ॥
स्थापायाला स्वराज्य दंडायाला मत्तांला
मदत करी तुळजा, हा राजा अवतारी झाला. ॥
डाव मांडिला पांची–प्राणां लावुन पैजेला.
कोण जिवाचे साथी ? या––ते साहस कर्माला. ॥
स्थैर्याचे धैर्याचे क्षत्रिय वृत्तीचें असती
वाण सतीचें त्यांनीं घ्यावें हें उचलुन हातीं. ॥
पहा पहा ते पितर आपुले काय बरें म्हणती ––
"आभाळांतून पडला कां हो ? तुम्ही धरेवरती ? ॥
" भरीव छाती वळीव भुज हे दिले तुम्हां आम्हीं
" स्वोदरपूर्तीकरितां केवळ आणु नका कामीं. ॥
" डोळे वाणी अमुचे बघते वदते त्यांत तुम्हीं
" जीवलतेची नवती अमुची फुलली, तेच तुम्ही " ॥
" स्वप्नजागरीं पडछायेसम आम्ही सांगाते
" करित मोकळे आहों तुमचे विजयाचे रस्ते " ॥

––बी

––––––––

## १. संयुक्त महाराष्ट्र

जनतेच्या सत्तेची ज्योत जागति
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ।

फिरंग्यास गोव्याचच्या चारुनी खडे
माय मराठीच अशी चालली पुढें
एकभाषिकांची जिथें होय संगती ।। १ ।।

हो, निजाम, कोल्हापूर, औंध जंजिरा
जनतेच्या दास्याचा उजर जंजिरा
तोडेल त्या एक महाराष्ट्र संस्कृति ।। २ ।।

सह्य पठारीच्या तेजस्वी रणकथा
रंगति शाहीरमुखें गाणीं ऐकतां
इतिहासांतुनि मिळे स्फूर्ति अन् गति ।। ३ ।।

कोंकणच्या दुःखाचीं तरल स्पंदनें
नागपुरी जनतेचीं हलविती मनें
एक माय धरणीला जेथ मानिती ।। ४ ।।

शेतकरी जमिनीचा एथल्या धनी
कामगार जनता ही येथ अग्रणी
श्रमजीवी सत्तेची येथ शाश्वती ।। ५ ।।

भिन्न भिन्न धर्माचीं सर्व बंधनें
तोडुनियां एकजीव जाहलीं मनें
लोकयुगासाठि जिथें रक्त सांडिती ।। ६ ।।

—डॉ. फडके

## १०. संयुक्त-महाराष्ट्र-गीत

जयजय महाराष्ट्र जय महाराष्ट्र माझा ।।
सकल गुणांचा राजा ।।धृ०।।

मराठवाडा विदर्भ आणी खानदेशचे शेतमळे
गोमांतक नंदनवन माझें, कोंकण फुलवी फुलेंफळें
तापि, नर्मदा, गोदा, कृष्णा, आणि तुंगभद्रा भीमा
जीवन अर्पित पुढें चालल्या देशबांधवांच्या कामा
माय माउल्या गिरिजा ।। १ ।।

सह्याद्रीच्या लिपींत लिहिला वीरश्रीचा इतिहास
पूज्य समाधी विराम चिन्हें संतजनांचा सहवास
शौर्य, धैर्य, त्यागानें ज्यांच्या भूषविलें तुझिया विभवा
शक्ति आणखी भक्तीचा हा इथेंच जुळला खरा दुवा !
हीच प्रभूची पूजा ।। २ ।।

सचेतनासी द्याया मसलत अचेतनाला फुटे गिरा
मराठमोळ्या तुला सांगतो रायगडाचा चिरा चिरा
इथें पताका आणिक भाला लाल मृदंगी ढाल चढे
वारकऱ्यांचा धारकरी हो रक्ताचे शिंपुनी सडे
जय महाराष्ट्र गर्जा ।। ३ ।।

ज्ञानेश्वर एकनाथ तुकया समर्थ संतांची माला
मानवतेचें बीज रोंवुनी सदा जागविति आम्हांला
वंद्य शिवाजी पहिले बाजी, लोकमान्य, ऐसे वीर
स्वातंत्र्याचा मंत्र देउनी केला ज्यांनीं संचार
दावुनियां नवतेजा ।। ४ ।।


१०६५

संकट येतां लढलों आम्ही धांव घेत उत्तरेकडे
भारत-देशा संरक्षाया सैन्य आमुचें सदा खडें
परंपरेनें देत अम्हांला शक्ति आणि वेदना धडे
करांत कर घालुनी चालल्या बुद्धि आणि भावना पुढें
उघड हृदय दरवाजा ॥ ५ ॥
जयजय महाराष्ट्र जय महाराष्ट्र माझा

--सोपानदेव चौधरी



भाग दुसरा

# भारत-विषयक कविता

आपल्या मायभूमीचा अभिमान प्रत्येकास असतो. आपली भारतभूमि ही कशी आहे, तिच्यांत कोणकोणते चांगले गुण आहेत, तिच्या पोटीं कोणकोणत्या सुपुत्रांनीं जन्म घेतला इत्यादि विषयांवर कवींनीं अनेक कविता रचल्या आहेत. त्यांतील कांहीं येथें घतल्या आहेत. भारतमातेला आज जरी वाईट दिवस आले असले तरी त्यामुळें खिन्न न होतां पुनश्च 'सोन्याची द्वारका' उभी करण्याचा आदेश कवींनीं दिला आहे. भारतमातेविषयींचा उत्कट अभिमान बॅ. सावरकरांच्या 'प्रियकर हिंदुस्थान' मध्यें दिसून येतो. आमचा भारत खंड हा अजिक्य आहे, परचक्र आलें तेव्हां जरी आम्ही लव्हाळ्या-सारखें किंचित् काळ लवलों तरी फिरून आम्ही आमचें निशाण उभारूं; आमचें रक्त थंड पडलेलें नाहीं. राष्ट्रासाठीं सर्वस्वाचा होम करण्यास सिद्ध झालेल्या तरुणास आपला पूर्व-काळ ठाऊक असणें जरूर आहे. उदासीनता व अडथळे यांना न जुमानतां आपण प्रगति केली पाहिजे म्हणजे यशसिद्धी फारशी दूर नाहीं. असा संदेश येथें कवींनीं दिलेला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'अशोकचक्रांकित तिरंगी ध्वज' हा भारताचा राष्ट्रीय ध्वज ठरला आहे. देशाबरोबरच ध्वजाचाहि अभिमान सर्वांना असतोच. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं स्वातंत्र्य मिळालें तेव्हां या ध्वजाविषयींच्या कोणत्या भावना कवीच्या मनांत उद्भवल्या त्या 'अशोकचक्रांकित तिरंगी ध्वज' (भाग ४ मध्यें) या कवितेंत वाचा.

## ११. बंदिशालेंत

राष्ट्रदेवते ! प्रणाम करितों प्रेमनिर्भरें तुला
देई गे आशीर्वचना मला
कशास वाहूं बोल फुकाचे भारतमाते तुला ?
बोलही खोल पहा चालला
कितिक लोटांगणें घालणें तुझिया चरणांवर
नको भक्तीचें अवडंबर
चहुंकडे पसरलें जाळें परदास्याचें अवकाळीं
त्यांतही पहा हे आले दुर्विलास अमुच्या भालीं
चालले नाटकी चाळे हे तुझिया नांवाखालीं
परंतु सारे तुडवुनि पायीं मिळविन मी मातिला
देई गे आशीर्वचना मला ॥ १ ॥

छत्रपतींचे छत्रपतीही झाले अवनीवर
वाहुनी शिरकमलें तुजवर
तव चरणाचे दास झहाले अढळपदीं सत्वर
धन्य ते पुण्यश्लोक नरवर
यशोगान गाउनीं तयांचें तुष्ट होऊं कां मनीं
कोरडे धन्यवाद देउनी
कां यशोगान गावोनी शूराचि मान्यता भेटे ?
जणूं बांगड्याच फोनोच्या वाजतात ऐसें वाटे
छे नको नको ते चाळे मनिं मंगल आशा दाटे
मनांत चाले एक घोषणा; मुक्त करीन मी तुला
देइ गे आशीर्वचना मला ॥ २ ॥

किताब पदव्या लाथेसरसे, देइ झुगारुनि दूर
तुझ्या मी पायींचा किंकर
नकोत तीं सुंदर व्याख्यानें, तुजपुढतीं द्यावया
सतत मी तयार राबावया
पक्वानांचे मधुर घांस—छे नको नको कल्पना !
दीन जनतेच्या त्या यातना
स्वातंत्र्यप्राप्तिच्यासाठीं जाउनिया कारागारीं
ये किती करुण किंकाळचा बंधुंच्या हृदयविदारी
तें अन्न बंदिशालेचें गमतसे म्हणुनि विषारी
त्या अन्नाचा त्याग करुनि मी पडलों गे धरणिला
प्राणही कंठीं बघ पातला ।। ३ ।।

संग्रह प्रसिद्ध १९३२ —सोपानदेव चौधरी

---

## १२. सोन्याची द्वारका

हे तरुणा ! ऊठ, असा खिन्न होशि कां ?
सोन्याची उभवूं ये फिरुनि द्वारका ।।

पोलादी मनगट हें तुजसि लाभलें
बुद्धीचें वैभवही त्यांत चांगले
नीतीचा थोर म्हणुन तुज प्रशंसिलें
लाखाची घटिका नच जाऊं दे फुका ।। १ ।।

बघ मागें वळुन जरा काय चाललें
मिटुन असा घेऊं नको नेत्र आपुलें
तूं स्फुरतां आशेची बाग ही फुले
पेट न कां घेत अजून हृदय हेलिका ॥ २ ॥

विश्वासुन प्रभु तुजवर जन्म दे भला
दाखवी प्रभात तूंहि आज त्याजला
ऐक ! मायभूहि हांक मारिते तुला
वीरांची बघत तुटू. रत्न-मालिका ॥ ३ ॥

फाड जीर्ण जें जुनाट मलिन जाहलें
ओत सुर जे स्वतंत्र सौख्य ज्यामुळें
स्वर्ग नवा उभवाया शक्त जाहले
तुजवांचुन सोन्याची होय मृत्तिका ॥ ४ ॥

संग्रह प्रसिद्ध १९३३ —अज्ञातवासी

---

# १३. प्रियकर हिंदुस्थान

सकल जगामधि छान । आमुचें प्रियकर हिंदुस्थान
केवळ पंचप्राण । आमुचें सुंदर हिंदुस्थान ॥ध्रु०॥

बहुत पाहिले बहुत ऐकिले देश परी ते सान
सान मिसर पाताल आंग्लभू सान चीन जापान ॥ १ ॥

बहुत गिरी, परि तुझाच गिरिवर हिमालयाचा मान
कवण नदी दे श्रीगंगेसम पूत सुधाजल-पान ॥ २ ॥

कस्तूरी-मृग-परिमल-पूरित जिचें फुलावें रान
प्रभात-कालीं कोकिल-किलकिल-कूजित आम्रोद्यान ॥ ३ ॥

यज्ञ-धूम-सौगंध-मनोहर जिचें सामरव-गान
ऐकुनि येती जिथें कराया देव सोमरसपान ॥४॥

कालिदास कवि गाती, गौतम शिकविति सांख्य-ज्ञान
म्लेंच्छ-विनाशक विक्रम दे तुज स्वातंत्र्यश्रीदान ॥ ५ ॥

जिजा जन्म दे शिवा जिच्यास्तव गुरुपुत्रांचें प्राण
जिच्यास्तवचि त्या कुमारिकांसी विस्तवांत ये न्हाण ॥ ६ ॥

तुझ्या जलांहीं अनंत पितरां दिलें तिलांजलि-दान
पूण्यभूमि तूं ! पितृभूमि तूं ! तूं अमुचा अभिमान ॥ ७ ॥

जननि ! जगत्त्रयिं शक्त कोण जो करिल तुझा अपमान
प्राणदान-संसिद्ध असुनि त्वत्-त्रिदश्-कोटि संतान ? ॥ ८ ॥

जननि ! तुझ्या सन्मान-रक्षणीं अर्पुं रणीं हे प्राण
शत्रुकंठ भंगोनि घालुं तुज दारुण रक्तस्नान ॥ ९ ॥

लंडन १९०८ —वि. दा. सावरकर

## १४. अजिंक्य भारत-खंड

अजिंक्य भारतखंड
आमुचा अजिंक्य भारत खंड ॥,

लवू लव्हाळ्यापरी जरासे परचक्रांत प्रचंड
मिळेल संधी तेव्हां तेव्हां पुन्हां उभारूं बंड
आमुचा अजिंक्य भारतखंड

प्राणांचें ज्या बाण योजिले सज्ज देह-कोदंड
सळसळणारें विक्रमशाली रक्त न पडले थंड
आमुचा अजिंक्य भारतखंड

झालीं शकलें घेउं सांधुनी, करूं फिरून अखंड
दिला आजवर काय थोडका छिन्नपणीं भूदंड
आमुचा अजिंक्य भारतखंड

निशाण उभवूं दिव्य बघुन जें पृथ्वी पांचहि खंड
मुजऱ्यासाठीं भयें आदरें उभारील निज दंड
आमुचा अजिंक्य भारतखंड

बुद्धिभेद कुणि करो न अमुचा वितंड खल पाखंड
जरी द्यायचें आशीर्वच द्या "व्हा यशवंत उदंड"
आमुचा अजिंक्य भारतखंड

२०-१२-४२ —यशवंत

## १५. भरतभूमि

गेले जेथिल शैल उंच  चढुनी स्वर्गास भेटावया,
नाना दिव्य वनस्पती पसरुनी ज्यांची शिरें शोभलीं
जेथें धांवति निम्नगा मधुजला पावित्र्य संवाहिका
प्रेमें भारतकीर्तिमान भरिती ज्या दिक् दिगंतांतरीं. ॥१॥

जी भू कांचनरत्नधाम गणिली, देखून यद् वैभव
स्वर्गीं देवगणांसही क्षणभरी हेवा जिचा वाटला,
जीच्या संगरधीर शूर तनयीं जिंकोनि सारी मही
कीर्तीचा ध्वज रोपिला रिपुशिरीं पूर्वीं त्रिलोकांमध्यें ॥२॥

शास्त्रें सर्वही एकदां विलसलीं उत्कर्षुनी ज्या स्थलीं
विद्याही सगळ्या जिथें मुदभरें दासीपरी राबल्या
जेथें उज्ज्वल काव्यगायनकला गेल्या पराकोटिला
तत्त्वज्ञान जिचें अजून सगळ्या विश्वास संमोहितें ॥३॥

ती ही भारतभूमि सांप्रत किती हीन स्थिती पावली ?
सारेंही जग हांसते बघुनियां तीतें अवज्ञाभरें !॥
उत्कर्षस्थिति केधवां पुनरपि लाभेल देवा ! तिला ?
केव्हां सांग वळेल मंगलमयी दृष्टी कृपेची तुझी ?॥ ४ ॥

—रेंदाळकर

## १६. हा हिंददेश माझा

आनंद कंद ऐसा । हा हिंददेश माझा.
सत्यासि ठाव देई
वृत्तीस ठेवि न्यायी
सत्वास मानि राजा, । हा हिंददेश माझा. ॥ १ ॥

जगदीश जन्म घेई ।
पदवीस थोर नेई ।
चढवी स्वधर्म साजा । हा हिंददेश माझा. ॥ २ ॥

जनकादि राजयोगी,
शुक, वामदेव त्यागी
घुमवीति कीर्ति वाजा । हा हिंददेश माझा. ॥ ३ ॥

दमयंति, जानकी ती
शीलास भूषवीती
नटली नटेश गिरिजा । हा हिंददेश माझा. ॥ ४ ॥

विश्वास मोह घाली
ऐसी मुकुंदमुरली
रमवी जिथें निकुंजा, । हा हिंददेश माझा. ॥ ५ ॥

गंगा हिमाचलाची
वसती जिथें सदाची,
होऊनि राहि कलिजा । हा हिंददेश माझा. ॥ ६ ॥

पृथुराज, सिंह, शिवजी
स्वातंत्र्यवीर गाजी
करिती रणांत मौजा, । हा हिंददेश माझा. ॥ ७ ॥

तिलकादि जीव देही
प्रसवूनि धन्य होई,
मरती स्व-लोक काजा, । हा हिंददेश माझा. ॥ ८ ॥

जगिं त्याविना कुणीही
रमणीय अन्य नाहीं,
थोरांत थोर समजा । हा हिंददेश माझा. ॥ ९ ॥

पूजोनि त्यास जीवें,
वंदोनि प्रेम भावें,
जयनाद हाचि गर्जा । हा हिंददेश माझा. ॥ १० ॥

प्रकाशन-काल १९२४ आनंदराव टेकाडे

## १७. भारतलक्ष्मी

उच्चीचा ग्रह नसो एकही भारतवर्षाला,
असो भाग्यही तुच्छत्वानें झिडकारित याला !
मार्गीं याच्या असोत कण्टक असंख्य पडलेले,
निराश तरिही समजा भारतसुत नाहीं झाले !

स्वर्गींचे ग्रह बुद्धिबलें हें करितिल उच्चीचे
तेज तयांचे जाळुनि टाकिल तिमिराला साचें !
लोळण राहील घेत भाग्य मग याच्या पायाशीं
कण्टक जाऊनि पडतिल मार्गीं पुष्पांच्या राशी !
सातसमुद्रापलीकडे जरि सातपहाऱ्यांत
भारतलक्ष्मी असली तरिही येईल ती येथ !
नसे काल तो दूर, तयाच्या ऐका या हाका
स्वागत त्याचें करावया तर चला पुढें टाका !

नोव्हेम्बर १९३५ —मा. के. काटदरे

ग्रं.
१२३९

## १८. गाऊं कसें तरी ?

वद मायभूमि ! तूंतें गाऊं कसें तरी ?
तुज गीत गावयातें धजते न वैखरी ॥ ॥ ध्रु० ॥

जेणें भरुन रत्नें, मोत्येंहि आगळी
द्याव्यात ओंजळीच्या तुज नित्य ओंजळी —
तो अंबुधीच आतां परतंत्रता वरी
पृष्ठीं खुशाल वाही रिपुच्याहि रणतरी ! ॥ १ ॥



१५५०४

तव कूस धन्य केली किती वीरपुंगवीं —
एकाश्रुही तुझ्या त्या रणरंगि रंगवी !
गात काय पुत्रकांची तव साजला परी ?
— अंगार ठेवितातो निज मंदिरावरी ! ॥ २ ॥

ही सृष्टि सर्व व्हाया बटकी तुझी सदा,
साऱ्या तुझ्या सुतांही सेवावया पदा —
आता हवा प्रतापी शाहीर फाकडा
गानीं तुझेच करि जो अवघ्या जडाऽजडा ॥ ३ ॥

एकेक शब्द त्याचा हो वज्र वैरियां
जेते म्हणून नुरती लोकीं पहावया !
दुबळ्या गिरेस माझ्या थोरी न ही परी
— मग मायभूमि ! तूंतें गाऊं कसें तरी ? ॥ ४ ॥

आराधना १९३८

—वा. ना. देशपांडे



भाग तिसरा

# स्वातंत्र्य-संग्रामांतील क्रान्तिगीतें

आपल्या देशाला स्वातंत्र्य प्राप्त व्हावें यासाठीं अनेकांनीं विविध मार्गांनीं प्रयत्न केले. जहाल मतवादी तरुणांनीं सशस्त्र क्रांतीचा मार्ग अवलंबून आपल्या देहाचें बलिदान दिलें; सनदशीर मार्गांनीं म्हणजे–अर्ज, विनंत्या, डेप्युटेशन इत्यादि–नेमस्तांनीं प्रयत्न केले. लो. टिळक यांनीं स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही चतु:सूत्री जनतेपुढें ठेवली. महात्मा गांधींनीं असहकार, सत्याग्रह इ. अहिंसक मार्गानें स्वातंत्र्य संपादन कसें करतां येईल याचा क्रान्तिकारक मार्ग दाखवून दिला. अशा विविध मार्गांनीं स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं प्रयत्न करणाऱ्या तरुणांच्या भावना काय होत्या याची कल्पना आपणाला यांतील कवितांवरून येते. सुळावर जाणारा क्रान्तिकारक हंसतमुखानें मरण पत्करतो. त्यामागें त्याची तात्त्विक प्रखर ध्येयनिष्ठा दिसून येते. ‘ द्या आम्हाला सुळी ’ यांतील क्रान्तिकारक काय म्हणतो तें पहा. कारागृहांत अडकून पडलेल्या क्रान्तिकारकांना मृत्यूची भीति वाटत नाहीं. आपली मातृभूमि स्वतंत्र कधीं होईल हा एकच ध्यास त्यांना लागला होता. ह्या क्रान्तिकारकांचें ‘ बंड ’ मोडून काढण्यासाठीं परकीय सत्तेनें कसे अत्याचार केले याचेंहि वर्णन आपणांस यांतील जालियनवाला बाग या कवितेंत वाचावयास मिळेल. फांसावर जाणाऱ्या क्रान्तिकारकानें भारतमातेला केलेला शेवटचा प्रणाम व त्याची त्या वेळची भावना काय होती हें समजण्यासाठीं प्रा. अनंत काणेकरांची ‘ फांसावरून ’ ही कविता वाचावयाला हवी ! स्वातंत्र्यप्राप्तीकरतां प्राण अर्पण करावे, मरण वरावें हा संदेश गुरुजींनीं दिला आहे. ह्या सर्व क्रान्तिगीतांतून आणखी काय संदेश मिळतात ते शोधून काढा !

# १९. द्या आम्हांला सुळीं

द्या आम्हांला सुळीं, जाहलों आम्ही तुमचे बळी.
जगीं चिरन्तन नांदतील परि अमुच्या शाण्णव कुळी

खुडून टाका अम्हांस—आम्ही दुर्वांकुर भूतळीं
पाताळापर्यंत आमुची परंतु रुजली मुळी.

काय हटवुनी हटतो सागर ? हटेल एकीकडे
उफाळेल तो दुसरीकडुनी गिळून डोंगरकडे.

ज्वालामुखिला बघतां लिंपु ? काय कल्पना खुळी !
तोंच अनावर उद्यांस होइल जागृत शाण्णव कुळी.

भाऊराया ! देवकिचीं हीं वधा सात अर्भकें
किती तोकडे उपाय ? त्यांनीं होणारें कां चुके ?

बांधुनिया अंधार-कोठडचा, वधस्तंभ रोवुनी
बलोद्धतांनो ! धराल का अवतार-कार्य रोधुनी ?

शिळेवरी आपटा आमुचीं अहो शिरें कोवळीं
सुटून तुमच्या मुठींतुनी परि शक्ति जगीं मोकळी.

द्या आम्हांला सुळीं ! जाहलों आम्ही तुमचे बळी
अमरतत्त्व; अवतार तयाचा वाढतसे गोकुळीं

द्या आम्हांला सुळीं आणि व्हा कलेवरांचे धनी
फोडुनि पणत्या ज्योतितत्त्व कां जाई जगतांतुनी ?

द्या आम्हांला सुळीं, आणखी मूठ-मूठ घ्या धुळी
रुण्डमालिका अमुची त्या तर ज्योतीवर काजळी.

मरणीं अमुच्या अनेक फुलतिल लोकीं दीपावली
जेत्यांनो व्हा पराभूत हो देउनि आम्हां सुळीं.

खुशाल या फांसांत गुंतवा एकेकाचा गळा
पुरा साजरा करा आमुच्या विजयाचा सोहळा.

आजवरी जुळविली यथामति जी जीवितपुस्तिका
फांशीविण तिज नसे समुचिता भरत-वाक्यगीतिका.

द्या आम्हांला सुळीं; होउं द्या कृतार्थ जन्मुनि कुळीं
पितर मुक्तिच्या मोदे म्हणतिल, "धन्य पुत्र हे बळी".

भावि पिढ्यांना मिरवायास्तव अपुल्या वक्षःस्थळीं
तजेल अक्षय चिन्ह द्यावया द्या आम्हांला सुळीं.

—यशवंत

## २०. क्रान्ति-गीत

गर्जा जयजयकार क्रान्तिचा गर्जा जयजयकार
अन् वज्रांचे छातीवरतीं घ्या झेलून प्रहार !

खळखळुं द्या ह्या अदय शृंखला हातापायांत
पोलादाची काय तमा मरणाच्या दारांत ?

सर्पांनो, उद्दाम आवळा कसूनियां पाश
पिचेल मनगट परी उरांतील अभंग आवेश
तडिताघातें कोसळेल का तारांचा संभार
कधींही तारांचा संभार
गर्जा जयजयकार क्रान्तिचा गर्जा जयजयकार ! ॥ १ ॥

क्रुद्ध भूक पोटांत घालुं द्या खुशाल थैमान
कुरतडुं द्या आंतडीं, करूं द्या रक्ताचें पान
संहारक काली, तुज देती बळीच आव्हान
बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान
मृत्युंजय आम्ही ! आम्हांला कसलें कारागार ?
अहो, हें कसलें कारागार
गर्जा जयजयकार क्रान्तिचा गर्जा जयजयकार ! ॥ २ ॥

पदोपदीं पसरून निखारे आपुल्याच हातीं
होउनियां बेहोष धांवलों ध्येयपथावरतीं
कधि न थांबलों विश्रान्तीस्तव, पाहिलें न मागें
बांधु न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार
होता पायतळीं अंगार
गर्जा जयजयकार क्रान्तिचा गर्जा जयजयकार ! ॥ ३ ॥

श्वासांनो, जा वायूसंगें ओलांडून भिंत
अन् आईला कळवा आमुच्या हृदयांतिल खंत
सांगा "— वेडीं तुझीं मुलें हीं या अंधारांत
बद्धकरांनीं अखेरचा तुज करिती प्रणिपात

तुझ्या मुक्तिचें एकच होतें वेड परी अनिवार
तयांना वेड परी अनिवार--"
गर्जा जयजयकार क्रान्तिचा गर्जा जयजयकार ! ॥ ४ ॥

नाचवितां ध्वज तुझ्या गुंतले शृंखलेंत हात
तुझ्या यशाचे पवाडे गातां गळयांत ये तात
चरणांचें तव पूजन केलें म्हणुनि गुन्हेगार
देतां जीवन-अर्घ्य तुला ठरलों वेडेपीर
देशिल ना पण तुझ्या कुशीचा वेडयांना आधार
आई, वेडयांना आधार
गर्जा जयजयकार क्रान्तिचा गर्जा जयजयकार ! ॥ ५ ॥

कशास आई, भिजविसि डोळे उजळ तुझें भाल
रात्रींच्या गर्भांत उद्यांचा असे उषःकाल
सरणावरतीं आज आमुचीं पेटतांच प्रेतें
उठतील त्या ज्वालांतुन भावी क्रान्तीचे नेते
लोहदंड तव पायांमधले खळाखळा तुटणार
आई, खळाखळा तुटणार
गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ! ॥ ६ ॥

आतां कर ओंकारा ! तांडव गिळावया घांस
नाचत गर्जत टाक बळींच्या गळयावरी फांस
रक्तमांस लुटण्यास गिधाडें येउं देत क्रूर
पहा मोकळें केलें आतां त्यासाठीं ऊर
शरिरांचा कर सुखेनैव या सुखेनैव संहार
मरणा, सुखेनैव संहार
गर्जा जयजयकार क्रान्तिचा गर्जा जयजयकार ! ॥ ७ ॥

१२-७-३९

-- कुसुमाग्रज

## २१. जालियनवाला बाग

रक्ताचे नच ओघळ सुकले अजूनि क्रुसावरचे
विरले ना ध्वनि तुझ्या प्रेषिता, अजुनी शब्दांचे
मंगल तव गीतांचा होतो मंदिरांत घोष—
" प्रेम, शांति अन् क्षमा यांमध्यें वसतो परमेश ! "

आणि आज हे तुझ्या पताका ज्यांच्या हातांत
निःशस्त्रांच्या रक्तामांसामध्यें नाहतात !
मर्दांच्या बंदुका उडाल्या मुला बायकांत
जगजेत्यांच्या पराक्रमाची स्फूर्तिप्रद रीत !

पाचोळ्यापरि पडली पाहुन प्रेतांची रास
नयन झांकले असतिल देवा, तूं अपुले खास !
असेल ही वा सैतानाची प्रभूवरी मात
एक जखम अन् नवीन येशू, तूझ्या काळजांत !

—कुसुमाग्रज

१९३६

## २२. फांसावरून

हा प्रणाम भारतमाते
घे शेवटचा बाळाचा। मायभू !
ही थोडी प्रियतम माती
हृदयीं धरितों दो हातीं। घट्ट गे

जरि असल्या चरणीं बेड्या
विसरशील का मज वेड्या । कधीं तरी ?
इतरांस
दुष्ट दैत्यांस
भासलों खास
जरी द्रोही मी–नाहलों तरी तव
प्रेमी । उत्कट ।

मज नको स्वर्गसुख धाम
चिंतीन सदा तव नाम । गोडसे.
मरणाची भीति कोणा ?
देशद्रोही षंढांना । भेंकडा !
देशार्थचि जन्मा आलों
देशार्थचि स्वर्गी गेलों । हांसत !
हे प्राण
देशनिर्वाण
मायभू त्राण
कराया नाहीं–वेंचिलें जयें
लवलाही । धिक् तया !

दे जन्म हजारों मजला
स्वातंत्र्यास्तव लढण्याला । देशि या
पाहतोंच डोळे भरुनी
रूप गे तुझे प्रिय जननी । एकदां !

बघुं नकोस केविलवाणी
मजकडे दीन नयनांनीं । देवते !
स्वातंत्र्य
दिव्य हा मंत्र
स्फुरवि जरि रक्त
तुझ्या बाळांचे–दिन पूर्ण
स्वातंत्र्याचे । जवळची.

या शेवटच्या घटिकेला
दिसतसे भावि तव काळ । मज गडे !
स्वातंत्र्याच्या उद्यानीं
फिरतांना दिसशी नयनीं । वैभवीं.
करितांना प्रिय तव काज
देहास ठेवितों आज । धन्य मी !
पाहुनी
प्रेत मम कुणीं
थरकला जनीं
देशभक्तीनें–तरि धन्य धन्य मम
मरणें । जाहलें !

१९२३ —अनंत काणेकर

# २३. येणार कोण बोला

आईवरी विपत्ति । आम्ही मुलें कशाला !
बंदींत मायभू ही । आम्ही खुलें कशाला !
जखडूनि बांधियेली । बघवें तिच्या न हालां
तिज फांस, नित्य फट्के । हृदयांत होय काला
रक्ताळलें शरीर । भडका जिवांत झाला
आईस सोडवाया । येणार कोण बोला ॥ १ ॥

आईस सोडवूंच । निर्धार हा कुणाचा ।
आहे कुणा पसंत । व्यवहार हा खुनाचा
आईस सोडवाया । खून स्वयें स्वतःचा
व्हावा सुखें कराया । व्यवहार हा खुनाचा
बेभान कोणकोण । पाहूनि माय-जाचा
या तेच सोडवाया । व्यवहार हा खुनाचा ॥ २ ॥

पाहूं स्वराज्य देशीं । या देहिं, याच डोळां
ऐसें म्हणे कुणी जो । काढा तया निराळा
जो कोणि असहकारी । विधिभंगभक्त भोळा
मरणें नको म्हणे जो । काढा तया निराळा
मरणें स्वयें पटे ज्या । मारूनि हांक काळा
आईस सोडवील । तो मातृभक्त भोळा ॥ ३ ॥

भाई महंमदीचे । तैसे हरीजनांचे
हिंदूसि ऐक्य पुरतें । व्हाया खरें मनाचें

हिंदूंसि त्यागबुद्धि । व्हावी; तदर्थ ज्याचें
मन आत्महोम वांच्छी । होमार्थ नित्य नाचे
तो ऐक्यभक्त भोळा । मरणें विशुद्ध त्याचें
आईस सोडवील । दास्यांतुनी सदाचे ॥ ४ ॥

गाऊनि आई आई । नाचोत नाचणार
लीहूनि लेख लाख । वाचोत वाचणार
घेऊनि बंदिवास । कांचोत जाचणार
भीऊनि यांस आई । सोडी न नाचणार
रक्ताळलें शरीर । भडका जिवंत झाला
आईस सोडवाया । येणार कोण बोला ? ॥ ५ ॥

संग्रह प्रसिद्ध १९३८ —सेनापति बापट

---

## २४. शूरवीर

वाहवा रे वाचिवीर प्रेमपाठी फाकडे !
वाहवा रे शूर राघू वेषवेडे भाबडे ॥ १ ॥

बंधुनाशीं दावितां शास्त्रोक्त औदासिन्य वा !
आणि पाळी आपुली येतांच, लोटे कां रडे ? ॥ २ ॥

या कुणी वंदा स्मृती केल्या कुणासाठीं पहा,
काळलेखांचा करा अभ्यास, वाचा, घ्या धडे ॥ ३ ॥

दुर्बळांची नागमोडी चाल ती शोभो तयां,
वीर पाताळांतुनीही खेंचुनि दे हांसडे. ॥ ४ ॥

संस्कृतीच्या रक्षणाला शक्ति कोठें दांडगी,
जिंकिते आर्यांस पूर्वी कां जहाले रांगडे ? ॥ ५ ॥
रोमचें साम्राज्य तें कां रानटयांनीं झोडलें ?
संस्कृतीचें ओज जातां केवढा घाला पडे ! ॥ ६ ॥
आपुल्या संरक्षणाची काळजी अन्यावरी ?
देवही पाही, न वारी भेकडांचें सांकडें. ॥ ७ ॥
स्वर्गवासी देव तो पाही परीक्षा तूमची,
का प्रतिक्षेनें वहाती शत्रुपापाचे घडे ? ॥ ८ ॥
बोलतां आम्ही सुपर्ण व्योमसंचारी परी,
जुंपिलें घाण्यास जातां आणि नेत्रीं झांपडे ! ॥ ९ ॥
जन्मला शार्दूल वंशी, सत्त्व जाणा, आचरा,
धूर्तता ये घेउनी कां जंबुकाचें कातडें ? ॥ १० ॥
शान्ततावादी बना सामर्थ्य अंगीं आणुनी,
व्यर्थ आत्मानात्मचिंता कां ? बघा देहाकडे. ॥ ११ ॥
काय हो शेळया हजारों एकटया वाघांपुढें ?
देववत् निश्चेष्ट देखा कागदींचे आंकडे ? ॥ १२ ॥
देश-धर्म-स्त्री त्रयीची या प्रतिष्ठा सांडुनी.
वांचवूं स्वप्राण पाही आर्य तो हें ना घडे. ॥ १३ ॥
मार खाऊनी जगावें—अप्रतिष्ठा ती नको !
क्षत्रियाला क्षेत्र तीर्थी—मृत्यु कार्यी आवडे. ॥ १४ ॥

प्रकाशन-संग्रह १९३३ — माधव जूलियन

## २५. स्वातंत्र्य

प्राण अर्पावे । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें ॥
केवळ बडबड ना कामाची
केवळ इच्छा ना कामाची
गरज असे निशिदिनिं कष्टांची
कष्टत जावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें.

विलास सुखभोगांना सोडा
मोह सकळ ते मारक तोडा
स्वार्थांकुर चित्तांतिल मोडा
निर्मळ व्हावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें.

देश-भक्तिचा मनांत काम
भारतभूचें वदनीं नाम
दृष्टि दिसावी तेजो धाम
निर्भय व्हावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें.

द्वेष-कलह ते विसरुनि जावें
बंधु-बंधुचे परी सजावें
हातीं हात प्रेमें घ्यावे
पुढें दौडावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें.

उचंबळोंनी वृत्ती जावी
वेडावुनि जणु मति ती जावी
तन्मय व्हावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें.

गुलामगिरिवर हाणा घाव
दास्या देशीं नुरोच ठाव
प्रयत्नावरि ठेवुन भाव
सदा झुंजावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें.

स्वातंत्र्याची जया तहान
धांवुन जाऊं घेऊं ठाण
गांठू ध्येया देऊं प्राण
व्रत हें घ्यावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें.

परवशतेचे तोडा पाश
तोडा तोडा हरपो त्रास
चीड नयेते काय तुम्हांस
चला चमकावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें.

परदास्याच्या पंकीं कीट
असणें, याचा येवो वीट
होऊनि सावध नीट सुधीट
निजपद घ्यावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें

स्वातंत्र्याचा ईश्वर-दत्त
हक्क करोनी घेऊं प्राप्त
करुं यत्नांची अपूर्व शर्थ
मरुनी जावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें.

निज मरणानें मंगल येईल
निज मरणानें वैभव येइल
निज मरणानें मोक्ष मिळेल
मरण वरावें । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें

१९३० —सानेगुरुजी

## २६. दिशाभूल

कर्तव्याचे आजवरी । दिवे लाविले काय तरी
विझलेली भूमातेची । ज्योत लावण्या आशेची
तैलांतरिचा चिकटपणा । अंगीं नुरला तो बाणा
तेल फुकाचें जाळितसां । कैंचि दिवाळी थाटितसां ? ॥ १ ॥

* * *

स्वधनें परका पोषियला । स्वजन भुकेनें मारियला
धनदाता जगिं शेतकरी । वृषभ तयाचा सहकारी
गोधन तें झालें हीन । कृषि-कष्टा आलें दैन्य
स्वधनाचा धनि होय दुजा । कसली करितां धनपूजा ? ॥२॥

* * *

दैन्याच्या गर्तेमाजी । भूमाता रुतली आजी
दीन-दलित-दुःखाश्रूंनीं । सर्वांगीं निथते भिजुनी
बदरंग तिचें रुधिरांग । रंगढंगि आम्ही दंग
उटणीं तेलें ह्या सोंगा । चोपडतां कसलें अंगा ? ॥ ३ ॥

* * *

सुभव्य गिरिवर उत्तरचा । महान सागर भवतींचा
निसर्ग सीमा देशाच्या । बनल्या बंदीशालेच्या
असूनि पोपट पंजरिंचे । गोडधोडशा अन्नांचे
तुकडे कसले मोडितसां । खातांना सुख मानितसां ? ॥४॥

* * *

स्फोट होउनी आशांचा । कलिजा धडके देशाचा
दारूखाना उडवितसां । मौज त्यांत कां मानितसां ?
छळिति गुंड कन्या-भगिनी । लाज न त्याची धुंद मनीं
काळघा तोंडा त्यां करवीं । ओवाळुन घेतां केवीं ? ॥५॥

* * *

असति भारतीं नग्न किती । परकी वस्त्रें बहु किमती
नटती परवश शव-शरिरें । दिशाभूल ही त्यजा त्वरें
स्वतंत्र राष्ट्रें हंसतील । देशभक्त ते वदतील
' धिक्‌धिक् कसली दिपवाळी । अकलेची तुमच्या होळी ! '॥६॥

ऑक्टोबर १९३१ —केशवतनय



## भाग चौथा

# स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 60646
शाखा

स्वातंत्र्य मिळेपर्यंत देशांतील सर्वांचें ध्येय ‘ स्वातंत्र्यप्राप्ति ’ हें होतें. व त्या दृष्टीनें जनतेंत स्वातंत्र्याविषयीं जागृति करणें, मायभूमीचा अभिमान वृद्धिंगत करणें, स्वातंत्र्याचा लढा लढविण्याची स्फूर्ति देणें व परकीय सत्ता नष्ट करण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करणें हें कार्य त्या वेळच्या नेत्यांनीं आपल्या भाषणांतून व कवींनीं आपल्या काव्यांतून केलें. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आतां परकीय सत्ताच उरली नाहीं. त्यामुळें जनतेला त्या सत्तेविरुद्ध चेतावणी देण्याचे कांहींच कारण नाहीं. पारतंत्र्यकालांतील क्रान्तीच्या गर्जना आतां उपयोगी पडावयाच्या नाहींत; पण स्वातंत्र्य मिळालें कीं याचा अर्थ आपलें काम संपलें असा नव्हे. स्वराज्याचें सुराज्य कसें होईल याचा विचार आपण केला पाहिजे. त्यामुळें विधायक कार्याकडे आपलें लक्ष गेलें पाहिजे. स्वातंत्र्यानंतर समाजाची रचना व राज्ययंत्राची रचना कोणत्या तत्त्वांवर अधिष्ठित करावयाची याचा विचार जनतेनें करावयाचा आहे.

स्वातंत्र्य मिळालेला दिवस इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्याजोगा आहे. त्या दिवसाचा आनंद आपणांस ‘ भारत माझा स्वतंत्र झाला ’ या कवितेंत वर्णन केलेला आढळेल. स्वातंत्र्यदेवीचें स्तवन श्री. गिरीशांनीं केलें आहे व तिचा जयजयकार केला आहे तो वाचा. स्वातंत्र्य मिळून आज सुमारें ५–६ वर्षें झालीं. त्यामुळें आतां राष्ट्राची रचना कोणत्या तत्त्वावर व्हावी याचा खल घटनापरिषदेनें करून भारत हें प्रजासत्ताक राष्ट्र असल्याचें नवीन घटनेनें जाहीर केलें. आतां सर्व जगांत समाजवादाचे वारे वाहूं लागले आहेत. कवींनीं आपल्या काव्यांतूनहि नवीन समाजरचनेची सूचकता व्यक्त केली आहे. ‘ आग ’ व ‘ बिजली ’ या कवितेंतून हाच ध्वनि निघतो. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाहीं; तर कर्तव्याची जाणीव व समाजाचा उत्कर्ष होण्यासाठीं श्रम करण्याची तयारी होय, हा संदेश ‘ स्वतंत्र झाल्यावर ’ या कवितेंत आपणांस मिळेल.

## २७. स्वतंत्र झाल्यावर

झालों जरी स्वतंत्र । सोडूं न ताळतंत्र ॥ध्रु०॥

स्वातंत्र्य स्वैर नाहीं
शिस्तींत जन्म घेई
हा हक्क जन्मसिद्ध । आम्ही जगीं स्वतंत्र ॥ १ ॥

निर्धास्त वाढ व्हाया
लागे अशीच छाया
छाया असून तेज । जीवास देत ओज ॥ २ ॥

हें ताट अमृताचें
हा कल्पवृक्ष नाचे
मरणास मृत्यु देई । आशा सपुष्प होई ॥ ३ ॥

वृद्धांस पूज्य मानूं
अनुभूति नित्य मानूं
चालूं परी स्वतंत्र । सोडूं न ताळतंत्र ॥ ४ ॥

हा देह रोज झिजवूं
पोटास अन्न मिळवूं
मागूं पित्या न वित्त । श्रम-जीवनीं चरित्र ॥ ५ ॥

गृहिं द्रव्य सांठलेलें
देशार्थ देउं सगळें
दारिद्रच-देव-भक्त । आम्ही खरे स्वतंत्र ॥ ६ ॥

व्यसनांस खोल गाडूं
निर्बंध दुष्ट तोडूं
आनंद सेवण्यांत । सोडूं न ताळतंत्र ॥ ७ ॥

अन्याय मुळीं न साहूं
सत्यास हार वाहूं
दुष्टांस हाणुं लाथा । आम्हीं असुं समर्थ ॥ ८ ॥

साधेपणा जनाचा
मोठेपणा मनाचा
हा थोर राजपंथ । आम्हां असे पसंत ॥ ९ ॥

साधेंच अन्न खाऊं
साधेंच वस्त्र लेवूं
दीनां मिळेल अर्थ । देशांत राहि वित्त ॥ १० ॥

प्रीती सुमार्गदायी
बाळास जन्म देई
सोडी न ताळतंत्र । म्हणुनीच धर्मवंत ॥ ११ ॥

अपवाद एक गणतां
साऱ्या जगांत माता
उतरूं कृतींत मंत्र । आम्ही निसर्ग-मित्र ॥ १२ ॥

बलवंत, वीर्यवंत
नयवंत, नीतिमंत
होऊं असे महंत । आम्ही खरे स्वतंत्र ॥ १३ ॥

जन्में कुणीहि असला
कोठें जगांत वसला
भाऊ अम्हां पसंत। त्यजि जो न ताळतंत्र ॥ १४ ॥

अमुच्या पराक्रमाला
जगिं बांध घालण्याला
नाहीं कुणी समर्थ। आम्ही खरे स्वतंत्र ॥ १५ ॥

सन्मित्र देवपाठीं
नभ यें म्हणूनि हातीं
काळावरीच मात। आम्हीं करूं जगांत ॥ १६ ॥

दैत्यांस उद्धरीलें
त्या देवरूप आलें !
मनुजेंच मूर्तिमंत। होतात देव, संत ! ॥ १७ ॥

विश्वांत राज्य अमुचें
बंधुत्व गोड नाचे !
स्फुरतो मुखांत मंत्र। आम्ही जगीं स्वतंत्र ॥ १८ ॥

स्वातंत्र्य-गीत गावें
निज रक्त सांडवावें
हें आत्म-दान देतें। स्वातंत्र्य मानवातें ॥ १९ ॥

प्रकाशन संग्रह १९३०

— नारायण केशव बेहरे.

## २८. स्वतंत्रते !

स्वतंत्रते नमोस्तुते ! नमोस्तुते स्वतंत्रते !
पवित्र घेइं अर्घ्य हें; नमोस्तुते, महात्मते !

अघोर रात्र कंठली घनांधकार सेविला !
सुरम्य आज तेज हें तुझें विशाल फांकतें !
न आग पोटिंची कधीं, न आग अंतरांतली--
विषण्ण शांतली, तरी विनम्र पूजिलें तुतें !
ज्वलन्त ओठ बोलले ! ज्वलन्त हात पेटले !
ज्वलन्त रक्त सांडलें सुपूजनार्थ. देवते !
तयांत शांतिभाव तूं उदात्त दिव्य दाविला,
प्रसन्न जाहलीस गे ! नमोस्तुते ! नमोस्तुते !

समर्थ लोकमान्य कीं हुतात्म वीर अग्रणी
खपुष्पमालिका शिरीं वरून वर्षतात ते ?
जवाहिरेंच मध्यरात्र वर्षली तुझ्यावरी,
प्रभातिची प्रसन्नता तरी वरी विराजते ?
सुरत्न शोभवी नव्या मयूर आसनावरी--
बसून येसि, तेज हें तरी तुझें झळाळतें ?
तशांत वाहिलीं कुणीं इथून लाल अंबुजें,
म्हणून दिव्य रक्तिमा ! जयोस्तुते ! नमोस्तुते !

नव्या मनूतल्या ऋचा विहंग मंजु गुंजती,
सतेज पल्लवांतुनी सताल गीत डोलतें !
करून वायु विंझणें, करून मेघ वर्षणें,
खळाळुनी नदी तुझें नवीन सूक्त बोलते !

"उदंड भद्रलाभ हो गुरुत्वदर्शनीं तुझ्या !"
सुवर्ण-तेज हें तरी हिमालयीं चकाकतें !
अखंड मायभूध्वजा नवीन मंत्र घोषुनी
तवागमार्थ गर्जते--'जयोस्तुते ! जयोस्तुते !'

१ ऑगस्ट १९४७ --गिरीश

---

# २९. अशोकचक्रांकित तिरंगी ध्वज

अशोकचक्रांकित राष्ट्राच्या ध्वजा महामान्या !
तुझ्या यशानें आज जाहली भारत-भू धन्या ॥ १ ॥
उज्ज्वलतेनें मंगलतेनें तुझ्या भव्यतेनें
स्वराज्य-दिन उगवला हिंदजन प्रणाम करि सुमनें ॥ २ ॥
प्रखर तपस्या सफल जाहली हौतात्म्यहि फळलें
राष्ट्रमहर्षी स्वर्गीं भूवरि आनंदित झाले ॥ ३ ॥
स्वातंत्र्याच्या वातावरणीं स्वैर विहारी तूं
हिंदजनांचा एकमेव आराध्य देवही तूं ॥ ४ ॥
भारतभूषण जनता वैभव स्वराज्यजीवन तूं
राष्ट्रलक्ष्मिच्या भालावरचें तेजस्वी कुंकू ॥ ५ ॥
स्वत्वासाठीं हक्कासाठीं माणुसकीसाठीं
तुझें श्रेष्ठपण तुझें ध्येय नित रक्षायासाठीं-- ॥ ६ ॥
कित्येकांनीं निर्भयतेनें प्राणार्पण केलें
बंदिवान कित्येक जाहले वनवासी झाले ॥ ७ ॥

स्वाभिमान राष्ट्रीय वृत्ति बलिदान धैर्य त्याग
तुझ्या दर्शनें जागृत होई कुशल कर्मयोग ॥ ८ ॥
मुत्सद्देगिरि शौर्य धैर्य निर्भयता विद्वत्ता
तत्परतेनें तुझ्याभोंवतीं नांदे अक्षयता ॥ ९ ॥
जिवन्त आणिक ज्वलन्त ऐसा तुझाच इतिहास
स्फूर्तिस्थानचि नितान्त होई हिंदी तरुणास ॥ १० ॥
तुझें तेज मत्तास थरकवो, उदात्तता दिपवो
शांतिप्रवणा क्रान्तीनें तव जगास सुख पावो ॥ ११ ॥
अशोकचक्र न सुदर्शनचि हें तारक विश्वाचें
वक्र दृष्टिला नमवुनि चिरडिल बल सैतानाचें ॥ १२ ॥
तुवां दावुनी स्वराज्य-दिन हा धन्य अम्हां केलें
महात्मनांच्या सुखस्वप्नांना मूर्तरूप धरलें ॥ १३ ॥
बाल लाल अन् पाल गोखले रवीन्द्र नौरोजी
हर्षाश्रूंचीं फुलें वर्षतिल तुजवरतीं आजी ॥ १४ ॥
तुझा शांति संदेशचि अंतीं पटेल जगतास
अन्यायी साम्राज्यलालसा पस्ताविल खास ॥ १५ ॥
भारतियांना अशोकचक्रा ! नित्य प्रेरणा दे
व्यापक निर्मल विकासशीला वृत्ति संचरू दे ॥ १६ ॥

—ग. वि. माळी

१५।८।१९४७

## ३०. भारत माझा स्वतंत्र झाला

झरझर झरझर जा मेघांनो । गर्जत गर्जत दाहि दिशांना
दिसेल मानव सांगा त्याला । भारत माझा स्वतंत्र झाला

गरुडा येथें थांब जरासा । ठेव बाजुला अमृतकुंभा
मार भरारी जा स्वर्गाला । स्वतंत्र भारत सांग जाहला
परसत्तेशीं झुंजत असतां । वीर मरण रे ज्यांस लाभलें
प्रणाम शतशः सांग तयांना । भारत अपुला स्वतंत्र झाला
जलदेवींनो नकाच थांबू । पाताळाप्रति लगबग धांवा
जागें करुनी त्या शेषाला । सांगा भारत स्वतंत्र झाला
स्वातंत्र्याच्या वाऱ्यांनो जा । गिरिकुहरीं संदेश पोंचवा
पत्थरांतुनी घुमवा बोला । भारत माझा स्वतंत्र झाला
थांब पांखरा जा पूर्वेला । क्षितिजाचीही लंघुनि सीमा
येइल भास्कर सांग तयाला । भारत माझा स्वतंत्र झाला
ध्वजा उंच जा हिमालयावर । जेथुनि दिसतिल अवघे सागर
जाउनि तेथें सांग जगाला । भारत माझा स्वतंत्र झाला
पारतंत्र्य रे ज्यांच्या माथीं । भारत त्यांच्या उभा पाठिशीं
सुळीं द्यावया अन्यायाला । भारत माझा स्वतंत्र झाला

१५ ऑगस्ट १९४७ —वसन्त सबनीस

## ३१. क्रान्तीची आग !

पेटवा रे पेटवा,
चेतवा रे चेतवा !

क्रान्तीची आग पेटवा,
क्रान्तीची आग चेतवा !! ॥ ध्रु० ॥

दिनरात घाम गाळुनि शिंपतो मळा
मोतियांची येई पिकावरी कळा;
अन्नावांचुनि किसानाची अवकळा
पेटवा रे पेटवा
चेतवा रे चेतवा
शेतकऱ्यांनो,
क्रान्तीची आग पेटवा,
क्रान्तीची आग चेतवा !! ॥ १ ॥

यंत्रांसवें बनुनि यंत्र रात्रंदिन
गिरणींत गांठीच्या गांठी वरुन;
बायकापोरांचें परि उघडें तन
पेटवा रे पेटवा,
चेतवा रे चेतवा
कामकऱ्यांनो,
क्रान्तीची आग पेटवा,
क्रान्तीची आग चेतवा !! ॥ २ ॥

खुशाल पेटूं दे क्रान्तीची मशाल
होतिल गरीब झोंपड्यांचेहि महाल
शुभ दीपावलि आनंदाची पहाल
पेटवा रे पेटवा,
चेतवा रे चेतवा
नव युवकांनो,
क्रान्तीची आग पेटवा,
क्रान्तीची आग चेतवा !! ॥ ३ ॥

— इन्द्रराव पवार, ( बी. ए. ऑनर्स )

## ३२. आग

ही आग भुकेची जळते अमुच्या पोटीं
मागतों खावया एकच आम्हीं रोटी ॥
लाविली तुम्ही ही कां हृदयाला टाळी
कां ऐकूं न ये ही पोटाची किंकाळी ॥ १ ॥

ही बघा तिजोरी भरली श्रीमंताची
वाहून चाललीं कोठारें धान्यांचीं
धन-धान्य निर्मितों आम्हीं ज्यांच्यासाठीं
लेकरें आमुचीं मरति उपाशी पोटीं ॥ २ ॥

आम्हींच राबतों यांच्या शेतांमधुनी
घालितों पिकांना घामाचें ना पाणी
पिकवितों आम्हीं जगिं अन्नाच्या या राशी
करतात फस्त हे आम्हीं मात्र उपाशी ॥ ३ ॥

गाडुनी आमुच्या शरिराचे सांगाडे
निर्मिती जगीं हे वैभवशाली वाडे
लोळति गादीवर खुशाल लावुन पडदे
रस्त्यांत झोंपती जिवन्त अमुचे मुडदे ॥ ४ ॥

हे नफेबाजिची करिती रोज दिवाळी
झोंपडींत अमुच्या चाले शिमगा होळी ॥ ५ ॥

—प्र. के. अत्रे

# ३३. बिजली

बिजली नाचेल गगनांत वादळ होईल जोसांत
जंगल जळेल वणव्यांत मंगल होईल देशांत
बिजली कडाड गर्जेल पाऊस धडाड येईल
पाणी चढेल शहरांत पाणी शिरेल शेतांत
बिजली वरून कोसळते सावध हवेलि ढांसळते
जाइल हवेली मातींत घरटं राहील शाबूत
बिजली कोणाला जाळील . बिजली कुणाला उजळील
बिजली येईल अवचीत न्याय करील जगतांत
बिजली कुठून येईल ? वादळ कुठून होईल ?–
शेतकऱ्यांच्या शेतामधुनी, औत फिरती, जमीन खणती,
लाख ऐरणी-घण खणखणती, घरांत घरघर जातीं फिरती,
भिंत लिंपती, मळे शिंपती, बिळे चालती, विटा भाजती,
पाठीवरुनी पाट वाहती, कैक करवती कुरकुर करती,
मडकीं घडती, चिखल तुडवती, कोणी विणती, सारे कण्हती
या औतांतुन, हातोडयांतुन या जात्यांतुन, या पात्यांतुन
या दात्यांतुन, या भात्यांतुन या कामांतुन, या घामांतुन
या अश्रूंतुन, या अग्नींतुन
—– ठिणगी फुटेल जोसांत येईल विजेच्या वेगांत
बिजली नाचेल गगनांत वादळ होईल जोसांत

—वसन्त बापट



# परिशिष्ट (अ)

## कवि–चरित्रपर टीपा

(१) **विनायक** (विनायक जनार्दन करंदीकर; १८७२–१९०९) आधुनिक राष्ट्रीय कवितेचे प्रवर्तक. काव्यसंग्रह—विनायकांची कविता.

(२) **द. अ. तुळजापूरकर** (कै. दत्तो अप्पाजी तुळजापूरकर) 'माझे रामायण' या पुस्तकाचे कर्ते; व्यवसाय—हायकोर्ट वकील.

(३) **वासुदेव गोविंद मायदेव** (१८९४) एम्. ए. व्यवसाय—अध्यापन. वास्तव्य—पुणें, मुंबई. काव्यसंग्रह—भावतरंग, भावनिर्झर, शिशु-गीत, बालविहार इ.

(४) **गोविन्दाग्रज** (राम गणेश गडकरी जन्म १८८५, नवसारी येथें. मृत्यु १९१९) कवि, नाटककार, विनोदी लेखक म्हणून प्रसिद्ध. कविता-संग्रह—वाग्वैजयंती.

(५) **कृष्णाग्रज** (यशवंत महादेव गद्रे) वास्तव्य—पुणें; काव्यसंग्रह—कृष्णाग्रज यांची कविता.

(६) **कुंजविहारी** (हरिहर गुरुनाथ कुलकर्णी—सलगरकर; जन्म १८९६) वास्तव्य—सोलापूर. 'सोलापूर मार्शल लॉच्या' वेळीं १ वर्ष कैद व ५०० रु. दंड. १९३५ ओनामामंदिर स्थापना. काव्यसंग्रह—गीतगुंजारव.

(७) **मो. सी. चौधरी** (जन्म १८९८) वास्तव्य—अमरावती; व्यवसाय—अध्यापन, सध्यां सेवानिवृत्त (कराची येथें मराठी–गुजराथी शाळांचे मुख्याध्यापक, फाळणीमुळें यांचें सर्वस्व नष्ट झालें. हिंदुस्थानांत आल्यानंतर संपादनाचें काम केलें.) काव्यसंग्रह—जास्वंदीचीं फुलें; फुलवेल.

(८) **बी** (नारायण मुरलीधर गुप्ते) गेल्या शतकाच्या अखेरच्या काळाचे कवि. काव्यसंग्रह—फुलांची ओंजळ.

(९) **डॉ. सुधीर फडके**—वास्तव्य—मुंबई.

(१०) **सोपानदेव चौधरी** (जन्म १९०७) कवि व काव्यगायक म्हणून दुहेरी प्रसिद्धि. जळगांव, नाशिक येथें वास्तव्य. व्यवसाय—लेखन. काव्यसंग्रह—काव्यकेतकी, अनुपमा.

(११) **अज्ञातवासी** (दिनकर गंगाधर केळकर) (जन्म १८९६) व्यवसाय—व्यापार; वास्तव्य—पुणें. काव्यसंग्रह—अज्ञातनाद, अज्ञातवासींची कविता.

(१२) **सावरकर** (विनायक दामोदर सावरकर) जन्म १८८३. वास्तव्य—मुंबई. थोर देशभक्त, क्रान्तिकारक, हिन्दुत्वाचे कट्टे अभिमानी, प्रभावी वक्ते. काव्यसंग्रह—सावरकरांची कविता.

(१३) **यशवंत** (यशवंत दिनकर पेंढरकर) (जन्म १८९९) सेवानिवृत्त सरकारी नोकर, वास्तव्य—पुणें. काव्यसंग्रह—यशवंती, वीणा-झंकार, यशोधन, जयमंगला, बंदिशाळा, काव्यकिरीट, यशोगिरि इ.

(१४) **आनंदराव टेकाडे** (जन्म १८८८) व्यवसाय शेती. वास्तव्य—नागपूर. काव्यसंग्रह—आनंदगीत भाग १ ते ४.

(१५) **ए. पां. रेंदाळकर** (कै. एकनाथ पांडुरंग रेंदाळकर, जन्म १८८९ मृत्यु १९२०) जन्म कोल्हापूर संस्थानांतील रेंदाळ या गांवीं झाला. काव्यसंग्रह—रेंदाळकरांची कविता (दोन खंड).

(१६) **मा. के. काटदरे** (माधव केशव काटदरे, जन्म १८९२) सेवानिवृत्त सरकारी नोकर, वास्तव्य—चिपळूण. काव्यसंग्रह—कवि माधव यांची कविता.

(१७) **वा. ना. देशपांडे** (वामन नारायण देशपांडे, जन्म १९०३) व्यवसाय—अध्याप. नवास्तव्य–यवतमाळ. काव्यसंग्रह—आराधना.

(१८) **कुसुमाग्रज** (वि. वा. शिरवाडकर) जन्म १९१२. व्यवसाय––अध्यापन. वास्तव्य––नाशिक. काव्यसंग्रह––जीवनलहरी, विशाखा, किनारा.

(१९) **अनंत काणेकर** (जन्म १९०५). व्यवसाय––अध्यापन व लेखन. वास्तव्य––मुंबई. काव्यसंग्रह––चांदरात इ.

(२०) **सेनापति बापट** (पांडुरंग महादेव बापट) जन्म १८८०. थोर त्यागी देशभक्त व क्रान्तिकारक; मुळशी सत्याग्रहाचे नेते.

(२१) **माधव जूलियन** (माधव त्रिंबक पटवर्धन) एम्. ए.; डी. लिट्. (१८९४–१९३९) मराठी भाषेचे ज्वलंत अभिमानी––काव्यशास्त्राचे सखोल अभ्यासक––पुणें, कोल्हापूर येथें अध्यापनाचें कार्य. काव्यसंग्रह––विरहतरंग, गज्जलांजलि, छंदोरचना इ.

(२२) **साने गुरुजी** (पांडुरंग सदाशिव साने एम्. ए. १८९९–१९५०) 'साधना' साप्ताहिकाचे संस्थापक व संपादक. भारतीय संस्कृति, श्याम, श्यामची आई इ. अनेक ग्रंथांचे लेखक. काव्यसंग्रह––पत्री.

(२३) **केशवतनय** (बापू केशव पुराणिक) जन्म १९०४. वास्तव्य––धुळें, व्यवसाय––अध्यापन. १९२० सालापासून विविध लेखन.

(२४) **गिरीश** (शंकर केशव कानेटकर) जन्म १८९३. व्यवसाय––अध्यापन (निवृत्त). वास्तव्य––सांगली. काव्यसंग्रह––वीणा-झंकार, अभागी कमल, आंबराई, मानसमेघ, फलभार, चंद्रलेखा इ.

(२५) **ग. वि. माळी सावदेकर** (साहित्य प्राज्ञ) जन्म १९०१. वास्तव्य––रावेर; व्यवसाय––अध्यापन––मुख्याध्यापक, कन्याशाळा रावेर पू. खा.

(२६) **वसंत सबनीस बी. ए.** (रघुनाथ ऊर्फ वसंत दामोदर सबनीस. जन्म १९२३) व्यवसाय––सरकारी प्रसिद्धी खात्यांत नोकरी. वास्तव्य––डोंबिवली.

(२७) **नारायण केशव बेहरे.** वास्तव्य––कॉंग्रेसनगर, नागपूर. काव्यसंग्रह––मोत्यांची माळ.

(२८) **इंद्रराव पवार** बी. ए. (ऑ.) जन्म १९२८ शिरपूर येथें. वास्तव्य—जळगांव. येथील प्रा. ट्रे. कॉलेजांत अध्यापक. नियतकालिकांतून स्फुट काव्यलेखन. काव्यसंग्रह—गुरुजींचीं गोड गाणीं.

(२९) **प्र. के. अत्रे** (प्रल्हाद केशव अत्रे) जन्म १८९८. व्यवसाय—अध्यापन, संपादक, चित्रपट व्यवसाय. नाटककार, लेखक, कवि, म्हणून प्रसिद्ध. वास्तव्य—मुंबई. काव्यसंग्रह—गीतगंगा, झेण्डूचीं फुलें इ.

(३०) **वसंत बापट** (जन्म १९२२). व्यवसाय—अध्यापन, वास्तव्य—मुंबई. काव्यसंग्रह—बिजली.

# परिशिष्ट (ब)

## वाचनीय काव्यसंग्रह

| | | |
|---|---|---|
| १. | ओजस्विनी | यशवंत |
| २. | यशोगिरी | ,, |
| ३. | यशोधन | ,, |
| ४. | यशवंती | ,, |
| ५. | भावमंथन | ,, |
| ६. | फलभार | गिरीश |
| ७. | मानसमेघ | ,, |
| ८. | चंद्रलेखा | ,, |
| ९. | पत्री | साने गुरुजी |
| १०. | विशाखा | कुसुमाग्रज |
| ११. | काव्यकेतकी | सोपानदेव चौधरी |
| १२. | तांबे यांची समग्र कविता | |
| १३. | बालकवींची समग्र कविता | |
| १४. | सावरकरांची कविता | |
| १५. | मराठ्यांचीं संग्राम-गीतें | द्. आ. तिवारी |
| १६. | राष्ट्रीय गीतें | मो. सी. चौधरी |
| १७. | गोविंद यांची समग्र कविता | |
| १८. | बिजली | वसंत बापट |
| १९. | गीतगंगा | आचार्य अत्रे |

## वाचनीय कविता

**विनायक**—( विनायकांची कविता ) ( १ ) देशभक्तांचा अपूर्व सोहळा ( २ ) मातृभूमीचे लेणें.

**गिरीश**—(मानसमेघ)—धन्य महाराष्ट्र.

**साने गुरुजी**—( पत्री ) ( १ ) भारतमाता ( २ ) माझी एकच इच्छा ( ३ ) स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई ( ४ ) प्रतिज्ञा.

**सावरकर** (सावरकरांची कविता )—( १ ) स्वतंत्रतेचें स्तोत्र ( २ ) अमुचा स्वदेश हिंदुस्थान.

**आचार्य अत्रे**—चले जाव ( १९४२ च्या ' Quit India ' ह्या चळवळीच्या वेळीं रचलेली कविता ).

**बोरकर**—तेथें कर माझे जुळती.

**वसंत बापट**—झेलमचे अश्रू.

REFBK-0008066
REFBK-0008066

किंमत सव्वा रुपाया

रु.
१२३९

कवींचा त्रोटक परिचय, वाचनीय कवितासंग्रह व कांहीं वाचनीय कवितांचीं नांवें यांत दिलीं आहेत.

१५०८४
९/११/५३

प्रकाशक :—शं. बा. चितळे, एम्. ए., बी. टी., अ. वि. गृह प्रकाशनासाठीं
६२४ सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक :—वि. बा. गांगल, एम्.एस्सी., लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव पेठ, पुणें २.